बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार,दि.१७ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# काळजाचा थरकाप उडविणारा थरार!

**पुढे येईल त्याला धडकत सुटले भरधाव वेगातील कंटेनर** | **अपघाता एक महिलेचा जागीच मृत्यू तर २५ पेक्षा जास्त जखमी** | **जखमी एका पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश** | **कंटेनर लोखंडी सावरगाव जवळ अडवून संतप्त जमावाने लावली आग**

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: शहरात दुपारी ३ च्या सुमारास एक भरधाव कंटेनर रस्त्यात भरधाव वेगात धावत होते आणि समोर जे येईल त्याला चिरडीत होते. या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून पंचवीस जणांपेक्षा जास्त जखमी झाले आहेत. सदर कंटेनर युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी अडविण्याचा प्रयत्न करूनही ते थांबले नाही. ते एका वळणावर पलटी झाले. ते कंटेनर पलटी होताच कंटेनरला आग लागली.

या बाबतची माहिती अशी की, दि. १६ मे रोजी की, नेकनुरकडून एक भरधाव वेगात कंटेनर क्र. (डी डी– ०१/झेड–९७७१) येत असल्याची माहिती नेकनुर पोलिसांनी केज पोलिसांना दिली. ते कंटेनर अडविण्यासाठी केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वैभव पाटील, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस उपनिरीक्षक राकेश बनसोडे, वाहतूक शाखेचे शहा, पाशा, शिवाजी कागदे, आणि इतर पोलिस हे चौकात थांबले होते. मात्र भरधाव वेगातील कंटेनरने शिक्षक कॉलनी जवळ असलेल्या होंडा शो– रूम जवळ एका टमटम क्र. (एम एच– २३/एच– ५४५) याला जोराची धडक दिली. त्यातील प्रवाशी जखमी झाले. त्या नंतर पुढे त्या कंटेनरने शासकीय विश्राम गृहा समोर उभ्या असलेल्या मोटार सायकल क्र. (एम एच– ४४/ए डी– १४६०) आणि क्र. (एम एच– ४४/ए सी– ५८१४) याला दोन मोटार सायकलींना धडक पान २ वर





### पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे थोडक्यात बचावले

अपघातातील भरधाव वेगातील कंटेनर हे केज येथील धारूर चौकात येत असल्याची माहिती मिळताच त्याला अडविण्यासाठी पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे हे रोडवर येऊन थांबविण्याचा प्रयत्न केला परंतु ते कंटेनर सरळ अंगावर येत असल्याने त्यांनी प्रसंगावधान राखून चपळाईने बाजूला झाले त्यामुळे ते थोडक्यात बचावले !

### केजला हवाय रिंग रोड

केज शहरातून दोन हाय– वे जात असल्याने आणि शहरात मोठी गर्दी असते. तसेच वाहने व दुचाकी रस्त्यावर उभ्या कराव्या लागतात. यामुळे अशा घटना टाळण्यासाठी शहरा बाहेरून एखादा रिंग रोडची आवश्यकता आहे.

**कंटेनर चालक जखमी**



कंटेनर पलटी झाल्या नंतर त्याचा चालक जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाई येथे उपचार सुरू आहेत.

### या अपघातातील जखमी

१) कृष्णा हरिदास कापरे वय २० वर्ष, (रा. कापरेवाडी ता. केज), २) श्रद्धा मधुकर चिंचकर वय १८ वर्ष (रा. येवता ता. केज),३) सुनील सुंदर घुले वय ५९ वर्ष (रा. केळगाव ता. केज), ४) बळीराम आप्पराव पांचाळ वय ४० वर्ष (रा. ढाकेफळ ता. केज), ६) सोनू बाबु शेख वय २० वर्ष (रा. केज), ७) विकास वसुदेव काकडे वय २२ वर्ष (रा. कापरेवाडी ता. केज), ८) कुमार गायकवाड ५५ वर्ष (रा. देवगाव ता. केज), ९) शेषेराव मारुती चंदनशिवे वय ५५ वर्ष (रा. शिरपुरा ता. केज), १०) सरिता रावसाहेब मुंडे ५७ वर्ष (रा. चारदरी ता. धारूर), ११) फुलाबाई धोंडीराम सावंत वय ६० वर्ष (रा. तुगाव ता. अंबाजोगाई), १२)रावसाहेब यादवराव मुंडे वय ७९ वर्ष (रा. चारदरी ता. धारूर), १३) विद्या विलासराव सूर्यवंशी वय ३० वर्ष, (रा. पिसेगाव ता. केज), १४) विलासराव ज्ञानोबा सूर्यवंशी वय ४० वर्ष (रा. पिसेगाव ता. केज), १५) सिद्धेश्वर वसुदेव कापरे वय २२ वर्ष (रा. युसुफवडगाव ता. केज), १६) पोलिस कॉन्स्टेबल सिद्धार्थ शिंदे वय ३० वर्ष रा. युसुफवडगाव ता. केज), १७) अतुल बाबुराव कुलकर्णी, वय ४० वर्ष (रा. तांबवा ता. केज), १८) आशालता मुंडे वय ५० वर्ष (रा. चारदरी ता. धारूर), १९) बाबासाहेब देशमुख वय ४५ वर्ष (रा. बोरीसावरगाव ता. केज), २०) सौ. देशमुख ( बाबासाहेब देशमुख यांची पत्नी) वय ४० वर्ष (रा. बोरीसावरगाव ता. केज) आणि २१) शेख वय ३० वर्ष (रा. केज)

## केज उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार?

चर्चा:वरिष्ठांनी लक्ष देण्याची जनतेची मागणी




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: केज उपजिल्हा रुग्णालयात अधिकारी कर्मचारी मनमानी कारभार करत असल्याचे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे त्यामुळे रुग्णालयात येणारे रुग्ण त्रस्त झाले आहेत कारण त्यांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचे समजले जाते आहे रुग्णांनाची हेळसांड होत असल्याचे समजले जाते आहे अधिकारी कर्मचाऱ्यांना वेळेचे भान राहीलेले नाही तसेच कुठल्याही प्रकारचा उपचार वेळेवर दीला जात नाही अधिकारी कर्मचारी स्वताच्याच ऐटीत मौज मजे मध्ये फिरताना निदर्शनास येत आहे परंतु त्यांना नोकरी काय असते हे कळत नसल्यासारख वाटत आहे शासनाने पान २ वर

## मंडळाधिकारी कामावर संशय

बोंबला:ग्रामस्थांना पडला प्रश्न

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: केज तालुक्यातील चिंचोली माळी मंडाळाचे अधिकारी कुठे गायब असतात काही जनतेला समजना अनेक नागरिकांचे खोळंबली आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे तसेच मंडळ अधिकारी काम करण्यासाठी लाचलुचपत करता का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे चिंचोली माळी मंडळातील जमिनीच्या नोंदी आणि अभिलेख व्यवस्थित ठेवणे.

जमीन मोजमाप, फेरफार आणि इतर संबंधित कामांवर देखरेख ठेवणे. जमीन विवाद आणि तक्रारींचे निवारण करणे. महसूल वसुलीच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे मंडळात राबविण्यात येणाऱ्या विविध सरकारी योजनांची अंमलबजावणी करणे सरकारी योजनांचा लाभ लोकांना मिळवून देणे असे अनेक कामे मंडळात खोळंबली आहेत तसेच मंडळा मध्ये मुरुम वाहतूक जेसीबीने ट्रॅक्टर सर्रास सुरू कुठल्याही प्रकारचा धाक राहिलेला नाही तरी सुद्धा मंडळ अधिकारी मंडळात कधी फिरकत सुद्धा नाही तरी संमधीत प्रशासनाने तहसीलदार साहेब यांनी लक्ष घातले पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## वंचितची जिल्हा बैठक संपन्न!

राजकीय:स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक तयारी



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेत बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने आज शुक्रवार दि.१६ मे रोजी बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीची बैठक दुपारी बारा वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे संपन्न झाली.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील वंचित बहुजन आघाडीची सत्ता यावी, या दृष्टीने वंचित बहुजन आघाडी तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये वंचितचा झेंडा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी पान २ वर

## बेलंबा येथे घरफोडी

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: बेलंबा गावातील प्रकाश भगवान गित्ते (वय ६०) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात चोरट्याने उचकटून घरात प्रवेश करून सुमारे ६५,००० रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना दुपारी २ ते २.४५ च्या दरम्यान घडली.

गित्ते हे शेती व्यवसाय करत असून घटनेच्या वेळी घर बंद होते. संध्याकाळी ६.५९ वाजता त्यांनी ही बाब लक्षात घेऊन परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (२०,००० रुपये किंमत), २ ग्रॅम वजनाची स्त्रियांची अंगठी (१०,००० रुपये), मंगळसूत्रातील ४ ग्रॅम सोन्याचे मणी (२०,००० रुपये), व रोख १५,००० रुपये असा ऐवज आहे. परळी ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पो. नि. एम. ए. सय्यद, पो.हे.कॉ. पी. व्ही. वाले आणि आर. पी. केकान करत आहेत

**दुर्लक्ष** | **पवारवाडी–सोन्ना फाटा काम निकृष्ट**

## गुत्तेदाराला हवाय नुसता दाम ?

पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा:माजलगाव च्या पुर्व गावांना जोडणारा पवार वाडी ते कोथरुळ पर्यंतचा १५ किमी चा मुख्य मार्गाचे काम अंत्यत निकृष्ट पद्धतीने केले जात आहे .थातूरमातूर काम केले जात असून कमी वेळात ,स्वस्तात काम आटोपण्याचा प्रयत्न केला जात आहे .दोन पदरी रस्ता काम आहे, खरे तर रस्ता उखरुन त्याची दबई करुन काम करायला पाहिजे होते परंतु तसे न करता वरच्या वरी थातूरमातूर काम केले जात आहे. मुरुम / खडी अंतरुण त्या वर डांबराचा शिंपडा मारुन थूका पॉलिश केल्या जात आहे . नियमानुसार काम होत नसल्याने हा रस्ता वर्ष भर देखील टिकेल याची शाश्वती नाही . कित्तेक वेळेस हा रस्ता झाला परंतु प्रत्येक वेळी प्रत्येक गुत्तेदाराने हा रस्ता निकृष्ट दर्जाचाच केला आहे. मोगरा,पिंप्री,खतगव्हाण,डिग्रस,कोथरुळ , साळेगाव, आडगाव,टाकळी काही तांडे व इतर गावांचे नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून पार वैतागून गेले आहेत. ह्या मार्गाने किमान ५० गावे माजलगाव शी जोडली गेली आहेत. दररोज हजारो नागरिक या वरुन तालुक्याला प्रवास करतात परंतु ह्या मार्गाची नेहमीच वाताहत झालेली आहे . भिती पोटी कुणी तक्रार करत नाहीत ,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी पान २ वर



### अधिकाऱ्यांना लाजा का वाटत नाहीत?

ग्रामीण भागातील रस्ते अधिकारी आणि गुत्तेदारांचे कुरण बनले आहे. माजलगाव ला जोडणारा पवारवाडी – सोन्ना फाटा – कोथरुळ असा हा मार्ग याचे उत्तम उदाहरण आहे. दहा वर्षांत तीन वेळेस हा रस्ता केला असेल प्रत्येक वेळी रस्ता निकृष्टच केला जातो , गुत्तेदार पैसा कमवण्यासाठी रस्ता निकृष्ट करतो परंतु सुशिक्षित सार्वजनिक बांधकाम चे अधिकारी न बघताच बिले काढतात काय ? रस्ता निकृष्ट झाला आहे हे त्या अधिकाऱ्यांना का कळत नाही ? रस्ता चांगले करण्याच्या सुचना का दिल्या जात नाही हा अधिकाऱ्यांना जनतेतून प्रश्न आहे .

## सहा वन्यजीवांना जीवदान

माणूसकी:विनय कुलकर्णी यांचे कौतूक



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:निसर्ग मल्टिपर्पज फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तसेच प्राणी व सर्पमित्र विनय कुलकर्णी यांनी सहा वन्यजीवांना दिले जीवदान, सकाळी आठ वाजता ग्रामीण रुग्णालय येथून डॉ. जय आघाव यांनी कळवले की तेथे एक घुबड जखमी अवस्थेत पडले आहे, तेथे जाऊन पाहणी केली असता लक्षात आले की एक गव्हाणी घुबड विजेचा धक्का लागून जखमी झालेले आहे, त्यावर पशू वैद्यकीय अधिकारी डॉ रवी मुसळे यांनी प्राथमिक उपचार केले. त्यानंतर दहा वाजता सरस्वती गावातील शेतकरी गणेश डोईफोडे यांच्या शेतातील गोठ्यातून एका धामण जातीच्या सापाला वाचवले, साडे अकरा वाजता वडगांव तेजन येथील प्रकाश गुंजकर यांच्या शेतातील विहीरीत तीन दिवसांपासून पडलेल्या उदमांजराला बाहेर काढून तेथेच सोडून जीवदान दिले. दुपारी अडीच वाजता सुलतानपूर येथील पान २ वर

## कठोर आणि निस्पृह

न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यकाळ ऐतिहासिक ठरला. त्यांनी न्यायव्यवस्थेत महत्त्वाचे बदल केले. न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणली. न्यायालयीन गैरव्यवहाराची प्रकरणे कठोरपणे हाताळली. निवृत्तीनंतर कोणतेही पद स्वीकारणार नाही, असे त्यांनी जाहीर केले.केवळ सहा महिन्यांचा कार्यकाळ वाट्याला येऊनही देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून संजीव खन्ना यांची कारकीर्द अत्यंत ऐतिहासिक ठरली. न्यायव्यवस्थेत महत्त्वाचे बदल घडवून आणण्यात त्यांच्या निर्णयांचा मोठा वाटा होता. न्या. खन्ना यांनी २० वर्षे न्यायपालिकेत काम केले, त्यापैकी १४ वर्षे दिल्ली उच्च न्यायालयात होते आणि सहा वर्षांचा काळ सर्वोच्च न्यायालयात.'न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि न्यायालयीन गैरव्यवहाराची प्रकरणे कठोरपणे हाताळण्याचे त्यांचे प्रयत्न देशाच्या न्याययंत्रणेची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी कळीचे ठरले,' अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोशिएशनने निरोप समारंभात त्यांचा गौरव केला. त्यांनी उच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रस्तावांना गती दिली. प्रलंबित खटल्यांवर लक्ष केंद्रित केल्याने प्रकरणे निकाली निघण्याचा वेग अनेक पटीने वाढला.

न्या. यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी कोट्यवधींच्या नोटा सापडल्यानंतर न्याययंत्रणेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले. हे प्रकरण न्या. खन्ना यांनी कठोरपणे हाताळले. या प्रकरणाचा प्राथमिक तपास अहवाल सार्वजनिक करून जळिताचे फ ूटेज वेबसाइटवर टाकण्याचा निर्णय त्यांनी घेतला. एवढेच नव्हे; तर चौकशी आयोगाचा अहवाल त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांकडे पाठवून दिला. न्यायमूर्तींनी आपली मालमत्ता सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर जाहीर करण्याचा निर्णय या प्रकरणातील सर्वोच्च बिंदू होता. यामधून केवळ मालमत्ताच नव्हे, तर नेमणुकीची संपूर्ण प्रक्रियाच एका क्लिकवर सामान्य माणसाला उपलब्ध झाली आहे. त्यांच्या सत्कार समारंभात विधी व्यवसायात सत्याची मोडतोड केली जात असल्याची सल त्यांनी व्यक्त केली.निवृत्त न्यायमूर्तींची वेगवेगळ्या लवादांवर नेमणूक ही सामान्य बाब आहे. काहींनी थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरून 'इतिहास' घडवला असताना न्या. खन्ना यांनी मात्र निवृत्तीनंतर कोणतेही पद स्वीकारणार नाही, असे जाहीर करून आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

# एवढे अधिकार, हक्क दिले



इंग्लंड हा औद्योगिकीकरण करणारा पहिला देश असल्याने, कमी नियंत्रित आर्थिक चौकटीत औद्योगिक क्रांतीचे अनेकदा भयावह परिणाम भोगणारा तो पहिला देश. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून ते मध्यापर्यंत आधुनिक कामगार कायद्याचा पाया हळूहळू रचला गेला, तथापि, सुरुवातीच्या काळात, काही असमान पैलू होते, जसे की लक्ष्य महिला आणि मुलांपुरते मर्यादित होते आणि प्रौढ पुरुषांपुरते नाही, कारण कामाच्या परिस्थितीचे काही अधिक गंभीर पैलू कायद्याद्वारे हळूहळू सुधारले जात होते. हे मुख्यत्वे समाजसुधारकांच्या एकत्रित दबावामुळे साध्य झाले . भारतातही ब्रिटीशांनी कामगार कायदे केले.त्यात सुधारणा करण्यात आल्या.यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय कामगार कायद्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि त्यांच्या कल्याणासाठी कायदे बनवले. त्यांनी कामगारांना किमान वेतन, कामाचे तास कमी करणे, आणि सामाजिक सुरक्षा योजना यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. डॉ. आंबेडकर यांनी १९३४ च्या कारखाना कायद्यात सुधारणा केली, ज्यामुळे कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा झाली. या सुधारणांमध्ये पगारी सुट्ट्या, कामाचे तास कमी करणे आणि कामगारांच्या आरोग्याचे रक्षण करणे यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. १९३४ च्या कारखाना कायद्यातील सुधारणांमुळे कामगारांची पिळवणूक थांबली आहे. तसेच ,डॉ. आंबेडकरांनी १९४१ च्या खाण मातृत्व लाभ कायद्यात दोन वेळा सुधारणा केली आणि महिला कामगारांसाठी विशेष तरतुदींचा समावेश केला. डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना सुरू केल्या, ज्यात कामगार विमा योजना, कामगार कल्याण निधी आणि भविष्य निर्वाह निधी यांचा समावेश होता.त्यांनी कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी किमान वेतन मिळावे यासाठी आवाज उठवला आणि यासाठी कायदा बनवला.डॉ.आंबेडकरांनी महिला कामगारांसाठी खास कायदे बनवले, ज्यात त्यांना बाळंतपणाची रजा, आणि इतर सुविधा मिळाल्या. त्यांनी कामगारांना त्यांच्या हक्कांसाठी एकत्र येण्यासाठी आणि संघटना बनवण्यासाठी प्रोत्साहन दिले. डॉ. आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. स्वतः च्या पक्षाचे नाव मंजूर पक्ष असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार कायद्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि त्यांच्या कल्याणासाठी कायदे बनवले. त्यांच्या कार्यामुळे कामगारांना न्याय आणि समानता प्राप्त झाली.भारतीय कामगार कायदा म्हणजे भारतातील कामगारांचे नियमन करणारे कायदे . पारंपारिकपणे, संघीय आणि राज्य पातळीवरील भारतीय सरकारने कामगारांना उच्च दर्जाचे संरक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे.परंतु प्रत्यक्षात, मात्र कायद्यांना बगल देऊन, कामगारांना त्यांच्या संविधानिक हक्कापासून दूर ठेवले जाते.

भारतीय संविधानात कामगार कायदा समवर्ती सूची मध्ये आहे, याचा अर्थ केंद्र सरकार आणि राज्य सरकार या दोघांनाही कामगार कायद्यांशी संबंधित कायदे बनवण्याचा अधिकार आहे. संविधानातील कलम १४ कायद्यासमोर समानता. कलम १५ भेद-भावाला प्रतिबंध.कलम १६ सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये संधीची समानता. कलम २१ उपजीविकेचा हक्क. कलम २३ मानवी वाहतूक आणि सक्तीच्या कामावर बंदी.कलम २४ बालमजुरीवर बंदी.कलम ३९ (ड) समान कामासाठी समान वेतन. या सर्व कलामांच्या अधिन राहून कामगारांची नेमणूक आणि सुविधा दिल्या पाहिजेत. पण, यातील अनेक कलमांना हरताळ फासला



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

जात आहे.तसेच, कामगारांना त्यांच्या हक्काचे संरक्षण मिळवून देणे, जसे की बालमजुरीवर बंदी, कामाच्या योग्य आणि मानवी परिस्थितीची खात्री करणे, आणि सामाजिक सुरक्षा. कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात सुसंवाद आणि शांतता राखणे. सामाजिक न्यायासाठी काम करणे, ज्यात समान कामासाठी समान वेतन आणि लिंगावर आधारित कोणताही भेदभाव नसावा, याचा समावेश आहे. कामाचे तास, साप्ताहिक सुट्ट्या, आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता. किमान वेतन, वेतन देयक, आणि कामगारांच्या वेतनात वाढ. कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना, ज्यात आरोग्य सुरक्षा, पेन्शन, आणि इतर फायदे यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राज्य सरकार कामगार कायद्याशी संबंधित नियम आणि कायदे बनवू शकतात, जे केंद्र सरकारच्या कायद्यांपेक्षा अधिक कठोर कायदे राज्य सरकार बनवू शकतात.

१९५० पासून भारतीय संविधानात , कलम १४-१६, १९(१)(क), २३-२४, ३८ आणि ४१-४३ (अ) थेट कामगार हक्कांशी संबंधित आहेत . कलम १४ मध्ये कायद्यासमोर सर्वजण समान असले पाहिजेत असे म्हटले आहे, कलम १५ मध्ये विशेषतः म्हटले आहे की राज्याने नागरिकांशी भेदभाव करू नये आणि कलम १६ मध्ये राज्याच्या अंतर्गत रोजगार किंवा नियुक्तीसाठी संधीची समानता चा अधिकार वाढवला आहे. कलम १९(१)(क) प्रत्येकाला संघटना किंवा संघटना स्थापन करण्याचा विशिष्ट अधिकार देतो. कलम २३ सर्व प्रकारची तस्करी आणि सक्तीची मजुरी प्रतिबंधित करते, तर कलम २४ मध्ये कारखाना, खाणी किंवा इतर कोणत्याही धोकादायक रोजगारात १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालमजुरीवर बंदी आहे. ब्रिटिशांपासून कामगार कायदे अस्तित्वात आहेत.तर स्वातंत्र्यानंतर आपल्या संविधानाने कामगारांना मानवी हक्क दिले ते कामगार कायदे करून.जगातील कुठल्याही कामगारांना एवढे अधिकार हक्क दिले नसतील ते भारतीय संविधानाने दिले आहेत.त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा यथोचित गौरव कामगार दिनानिमित्त होणं आवश्यक आहे.

# बोर्डाच्या परीक्षेत मिळविले यश

## अभिनंदनिय:गजानन रणखांबचे यश



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:- धाराशिव जिल्ह्यातील तुगाव येथील गुणवंत विद्यार्थी कु गजानन तात्यासाहेब रणखांब या विद्यार्थ्याने लालबहादूर शास्त्री विद्यानिकेतन खेड या प्रशालेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत ९५.४० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला व यशाचं शिखर गाठलं जिद्द चिकाटी व अभ्यासाच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील शहरी भागाच्या तुलनेत पाठीमागे नाही हे त्याने आपल्या अभ्यासाच्या जोरावर दाखवून दिले व यश प्राप्त केले त्याच्या या उत्तुंग यशाबद्दल लाल बहादूर शास्त्री विद्यानिकेतन खेड येथे शिक्षणप्रेमी नागरिक सन्माननीय सचिन लोमटे यांनी त्याचा सन्मान करून त्याला पुढील यशस्वी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी त्यांचे वडील तात्यासाहेब रणखांब शाळेचे मुख्याध्यापक सच्चीदानंद लोमटे उपस्थित होते गजानन च्या यशाचे श्रेय त्याच्या आई वडिलांच्या प्रोत्साहनाला व शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि त्याच्या अथक परिश्रमाला जाते शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी गजाननच्या यशाचे कौतुक करत भविष्यातील यशासाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

## महात्मा फुले स्मारक समिती तर्फे छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ज्यांच्या पराक्रमाने स्वराज्याची धुरा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर तेवढ्याच प्रेरणेने आणि ताकदीने चालविली गेली अशा पराक्रमी, तेजस्वी, स्वराज्याच्या धाकल्या धन्याने केवळ नऊ वर्षांत आठ शत्रूंबरोबर एकही लढाई हरली नाही असे पराक्रमी राजे म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होते असे वक्तव्य प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी केले.

महात्मा फुले स्मारक समिती तर्फे आयोजित छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ते प्रमुख व्याख्याते म्हणून स्मारक स्थळी आयोजित अभिवादन सभेत बोलत होते. यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. पुढे बोलताना डॉ.चक्रे यांनी शिवपूर्वकालीन, शिवकालीन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर घडलेल्या इतिहासाची सांगड घालत संपूर्ण घडामोडी उपस्थित शिवप्रेमी, शंभूराजे प्रेमी नागरिकांना उलगडून दाखवत प्रबोधन केले. अध्यक्षीय समारोपात बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी जीवन आदर्शवत कसं जगायचं ते शिकवलं. तर, छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी मरायचं कसं हे उदाहरण जगासमोर ठेवलं. अवघ्या नऊ वर्षांच्या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराजांनी जेवढे युद्ध लढले तेव्हढेच युद्ध लढून सर्व लढाया जिंकणारा अपराजित योद्धा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होते. इतिहासातील सर्वात शापित राजे म्हणून छत्रपती संभाजी महाराज यांचे नांव येईल. कारण, तत्कालीन इतिहासकारांनी संभाजीराजांच्या कारकिर्दीला बदनाम करण्याचेच चुकीचे काम केले. परंतु, ज्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या खऱ्या इतिहासाचा आधुनिक इतिहासकारांनी शोध घेतला त्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीला तोड नाही असे सर्वांना मान्य करावे लागले असे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. छत्रपती संभाजी महाराजांचा जन्ममहोत्सव महात्मा फुले स्मारक समितीच्या वतीने ढगेज क्लासेस मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आदित्य कदम यांनी केले. तर व्याख्याते म्हणून डॉ.किरण चक्रे यांनी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप अत्यंत प्रभावी व अभ्यासू पद्धतीने डॉ.राजेश इंगोले यांनी केला. तर आभार सुनिल नरसिंगे यांनी मानले. या प्रसंगी संजय साळवे, डॉ.अनिल नरसिंगे, रत्नदीप गोरे, डॉ.मिलींद ढगे, प्रा.आदित्य कदम, भाऊराव गवळी, बि.के.मसने व परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

पान एक वरून

**काळजाचा थरकाप विद्विणारा**

दिली. त्या नंतर जुन्या उपविभागीय पोलिस उपअधिक्षक कार्यालया समोर रस्त्याने चालत असलेल्या मीना प्रवीण घोडके वय ३७ वर्ष (रा. चिंचोलीमाळी ता. केज) या महिलेला चिरडले. यात तिचा जागीच मृत्यू झाला. त्या नंतर धारूर चौकात उभ्या असलेल्या एका कार क्र. (एम एच- २३/ए एस- ०८९७) ला धडक दिली. त्या नंतर ते तसेच पुढे गेले. त्या नंतर चंदनसावरगाव येथेही दोघांना धडक दिली. या दोघे जखमी झाले आहे. त्यानंतर युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलिस उपनिरीक्षक राहुल पतंगे, बालासाहेब घोरपडे, राऊत, आतकरे, डोंगरे, जाधव, हनुमंत गायकवाड यांनी रस्त्यावर अडथळे लावून ते कंटेनरला रोखण्याचा प्रयत्न केला परंतु सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. त्या नंतर सदर कंटेनर हे लोखंडी सावरगाव येथील कळंब कडे जाणाऱ्या चौकात पलटी झाले आणि त्याला आग लागली.अपघातातील जखमीवर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना संदर्भिय सेवेसाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे हलविले असून त्यांच्यावर तेथे उपचार सुरू आहेत.

**केज उपजिल्हा रुग्णालयाचा**

अधिकारी कर्मचारी नेमले कशाला आहे हा प्रश्न निर्माण होत आहे त्यांना शासन पगार नेमका कशाचा देते असा प्रश्न नागरिकांना पडला आहे व केज शहर व परिसरातील जनतेला वेळेत व दर्जेदार उपचार मिळावेत, या उद्देशाने तत्कालीन आरोग्यमंत्री विमल मुंदडा यांनी केज शहरात उपजिल्हा रुग्णालयास मंजुरी आणून सुसज्ज अशी रुग्णालयाची इमारत व साधनसामग्री उपलब्ध केली. त्यामुळे मागील अनेक वर्षांपासून रूग्णसेवा व आरोग्य विभागाचे राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वीपणे राबवून जिल्हा व राज्य स्तरावरील शासनाचे पुरस्कार मिळवणारे उपजिल्हा रुग्णालय म्हणून जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**वंचितची जिल्हा बैठक**

तालुकाध्यक्षांसह सर्व कार्यकर्त्यांना बोलताना व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली.

याप्रसंगी बीड जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडी बीड पश्चिम जिल्हा कार्यकारिणी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर महिला जिल्हाध्यक्ष अनिताताई चक्रे माथाडी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश जावळे, महासचिव खंडू नाना जाधव, इंजि. विष्णू देवकाते, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर,सचिन मेघडबर,भीमराव औसरमल, संदीप रोकडे,भारत तांगडे,धम्मानंद साळवे, किरण वाघमारे, अजय गायकवाड,किशोर भोले, अंकुश जाधव,धम्मानंद पोळ,डॉ.गणेश खेमाडे, जंजाळ सर, लखन जोगदंड, मिलिंद सरपते,संदीप जाधव,उमेश तुळवे,राजेश जोगदंड,प्रभाग निहाय गण,गटनिहाय कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

**सहा वन्यजीवांना**

कृष्णा पिंपळे यांच्या पन्नास फूट खोल असलेल्या शेतातील विहीरीत दोन दिवसापासून पडलेल्या कोल्ह्याला बाहेर काढून तेथेच सोडून दिले, त्यानंतर रात्री साडे दहा वाजता देऊळगाव कुंडपाळ येथील रहिवासी श्री गाढवे यांच्या घरासमोर दोन धामण जातीच्या सापाना पकडुन नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. या सर्व रेस्क्यु ऑपरेशन मधे टीमचे सदस्य सर्पमित्र कमलेश आगरकर, सचिन कापुरे, विशाल वर्मा हे सर्व सहभागी होते.

**गुत्तेदाराला हवाय नुसता**

अर्थपूर्ण दुर्लक्ष करतात आणि गुत्तेदार तर जराही लाजा बाळगत नाहीत . या मुळे हा रस्ता सदैव खडकाळ आणि खड्डेमयच राहिला आहे. जेंव्हा पण हा रस्ता कोणत्या गुत्तेदाराने केला तो रस्ता झाल्यापासून सहा महीने देखील वेवस्थीत टिकला नाही . पालक मंत्री अजीज दादा पवार व कलेक्टर यांनी लक्ष देऊन कार्यवाही करायला हवी अशी मागणी होत आहे.

पान सहा वरून

**भारतीय सेनेच्या सन्मानार्थ**

यात्रेत भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आशिषजी शेलार, मंगलप्रभात लोढा तसेच भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

जाधव यांनी सत्कार केला तर तृतीय क्रमांक कवडे सयाजी नेताजी यांनी ९२.४० % गुण मिळवल्या बद्दल शालेय समिती सदस्य प्रा.संजय मिटकरी,अशोक कवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या वेळी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व उपस्थित विद्यार्थ्यांचा सत्कार ग्रामस्थ,शालेय समितीचे सदस्य व सरपंच ड.रामराजे जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.पांचाळ एस.डी व विद्यालयाचे सहशिक्षक श्री.कूमरे सर,श्री.मोरे सर,श्री देशमुख सर,लिपिक श्री.कोळपे,सेवक श्री.सतीश पवार,श्रीमती टेकाळे हे उपस्थित होते तसेच या वेळी गणित व इंग्रजी विषयात प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना विषय शिक्षक श्री देशमुख सर व श्री.मोरे सर याच्या तर्फे वैयक्तिक रोख स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले या वेळी सरपंच ड.रामराजे जाधव,शालेय समिती चे सदस्य प्रा.श्री संजय मिटकरी सर यांनी मार्गदर्शन केले तर अध्यक्ष समारोप ड.लालासाहेब कवडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री माळी एस.एल यांनी केले व आभारप्रदर्शन श्री देशमुख सर यांनी केले.

**कासारीत बैलगाडा शर्यतीचा**

व्यवस्था केली होती.यावेळी धाकलगावच्या पक्षा - पिस्टन बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवला. याकुब भाई पिंपळगाव च्या पुष्पा-भारत बैलगाडा द्वितीय, श्रीधर बाबुराव बडे, कासारी यांची लक्षा -बादशहा बैलजोडी तृतीय, ओमसाई प्रसन्न,छ.संभाजीनगरची राणा-सर्जा चौथा,सती सामंत पाचवा, परमेश्वर काकडे बालानगर, रेणुका माता प्रसन्न देवीदेगांव, जय हनुमान प्रसन्न आंबड या बैलजोड्या सहाव्या क्रमांकावर समान राहत विजय मिळवला. विजयी बैलगाडा मालकांना जयसिंह सोळंके, भरत नागरगोजे, नामदेव नागरगोजे,श्यामसुंदर बडे, बालाजी घुले,राजु सय्यद, दिपक मोरे,प्रशांत उघडे, जमीर पटेल सय्यद आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सर्व रोमांचकारी सामन्यांमध्ये उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते.विजयी बैलगाडा मालकांनी मैदानावर गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. कासारी ग्रामस्थांनी स्पर्धेचे चोख नियोजन केले होते. चित्रफित द्वारे अचूक निकाल देण्यात आला. बैलगाडा शर्यत यशस्वी करण्यासाठी आयोजक राजेंद्र बडे, दादासाहेब बडे,दत्ता केंद्रे, प्रशांत बडे, ऋषी बडे, बाबा शेख, विठ्ठल बडे, समाधान बडे, गोरक्षनाथ बडे, बाजीराव उघडे, चंद्रवदन घुले,संभाजी फड, बप्पा बडे, गणेश बडे ,प्रकाश घुले, तुकाराम बडे ,मैदान मालक नितीन बडे सह गावातील सर्व तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. झेंडा पंच म्हणून निलेश बोरगांवकर यांनी काम केले.स्पर्धेचे समालोचन अशोक खेत्रे व ऋषी सुरनर पहाडी आवाजात केले.

**पालखी महामार्गाला**

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात लोणार शहर प्रमुख गजानन जाधव प्रमुख निंबाजी पांडव भूषण मापारी सुधन अंभोरे माजी नगरसेवक शेख रौफ उपशहर प्रमुख लूकमान कुरेशी माजी शहराध्यक्ष नितीन शिंदे माजी नगरसेवक अरुण जावळे माजी नगरसेवक पंढरी चाटे एजाज खान विनोद डोईफोडे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते

**कार्यकर्तृत्वाचा घेतली**

मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे, उपाध्यक्ष शुभांगी काळभोर, कोल्हापूर विभाग अध्यक्ष विकास भोसले, डॉ. नितीन नाळे, हनुमंत चिकने यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या पुरस्काराचे वितरण ३१ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन, यशवंतराव चव्हाण सभागृह, कराड येथे करण्यात आले. हा पुरस्कार मी संत तुकाराम महाराज आणि अखंड भारताची सेवा व रक्षण करणारे जवान तसेच धारातीर्थ झालेले शहीद जवान यांना समर्पित करतो, असे पुरस्काराला उत्तर देताना विक्रम शिंदे म्हणाले.

## महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

पाटोदा: तालुक्यातील चुंबळी येथील शेतकरी महिलेने घरातील पत्र्याच्या अडूस गळफास घेऊन आत्महत्या केली. गुरुवारी दुपारी घटना उघडकीस आली. आत्महत्याचे कारण स्पष्टपणे समजू शकले नाही, मात्र खाजगी कर्जबाजारीपणातून आत्महत्या केली असावी असे सांगितले जाते. अलका तुकाराम पवळ (४५) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी शेजार घरी असलेल्या धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेऊन घरी परतल्यानंतर तिने आत्महत्या केली. दुपारी दोन वाजेच्या नंतर ही बाब उघडकीस आली. अलकाचे पती तुकाराम पवळ अल्पभूधारक शेतकरी आहेत. ते एका किराणा दुकानावर नोकरीस आहेत. काही दिवसापूर्वी तुकाराम यांचा अपघात झाला होता. उपचारावर मोठा खर्च झालेला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## कल्याण-डोंबिवलीतील शिल्पांची दुरवस्था

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रात अनेक चौकात वेगवेगळ्या ठिकाणी विविध विषयांवर शिल्प उभारण्यात आली आहेत. पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. डोंबिवली पश्चिमेला सम्राट चौकातील शिल्प, पूर्वेला टिळक नगर विद्यामंदिर शाळेचा परिसरात, सावित्रीबाई फुले नाट्य मंदिराच्या जवळील, बंदिश पॅलेस, कचोरे परिसरात, चक्की नका, आदि परिसरात सुंदर शिल्प आहेत पण त्याकडे महापालिकांच्या मालमत्ता विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्याची निगा राखली जात नसल्याने नक्की कोणत्या प्रकारचे शिल्प आहे हे समजून येते नाही.



### वेचक

## जिल्हाध्यक्षपदी नंदू परब यांची नियुक्ती



**डोंबिवली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर ठाणे जिल्ह्यात पक्षप्रवेशांची मालिका सुरू झाली आहे. पालिका निवडणुकांच्या तोंडावर भाजपाने ठाणे जिल्ह्यातील शहराध्यक्षांना हटवून त्यांच्या जागी नवीन शहराध्यक्षांची नियुक्ती केली आहे. भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या कल्याण-डोंबिवलीत कल्याण जिल्हाध्यक्षपदावरून नाना सूर्यवंशी यांना हटवून त्या जागी नंदू परब यांची नियुक्ती केली आहे. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी येताच कल्याण-डोंबिवलीत भाजपाचा महापौर बसणार, यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी केला.

## बाबा हरदेवसिंहजी यांना श्रद्धा सुमने अर्पित

**कल्याण :** संत निरंकारी मिशनच्या वतीने समर्पण दिवसाचे औचित्य साधून युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ एक भावपूर्ण व्हर्च्युअल संत समागम आयोजित करण्यात आला. सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिताजी यांच्या उपस्थितीत १३ मे रोजी आयोजित केलेल्या या समागमात देशविदेशातून लाखो श्रद्धाळूंनी ऑनलाइन सहभाग घेतला. समर्पण दिवसाच्या निमित्ताने मुंबई महानगर परिक्षेत्रामध्ये सुमारे ६० ठिकाणी विशेष सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले. समर्पण दिवसाच्या या व्हर्च्युअल संत समागमामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन हस्ते 'हरदेव वचनामृत' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.



## मिलिटरी स्कूलचा निकाल १०० टक्के

**कल्याण :** शिवनिकेतन ट्रस्ट संचलित, भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली (पू.) ता. कल्याण या शाळेचा दहावी व बारावीचा निकाल १०० टक्के लागला. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शाळेने निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. विद्यार्थी हे निवासी मिलिटरी स्कूलमध्ये शिक्षणाचा लाभ घेतात. दहावीच्या परीक्षेला शाळेतून एकूण ३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले, तर प्रथम श्रेणीत १९ व द्वितीय श्रेणीत ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इयत्ता दहावीत हर्ष चिटणीस ८८ टक्के, केदार कळसकर ८५.२० टक्के, सोहम जाधव हा ७८.८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. तसेच इयत्ता १२वीचाही निकाल १०० टक्के लागला असून शास्त्र शाखेतून मंत्र पाटील ७३.१७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल लागल्याबद्दल सर्व गुणवत्ता प्राप्त व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच प्र. मुख्याध्यापक महेश भावसार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि वसतिगृहाचे व्यवस्थापक विजय चव्हाण यांनी कौतुक केले.



## ती, मी आणि पुनश्च एव्हरेस्ट पुस्तकाचे प्रकाशन

**ठाणे :** सात खंडातील सर्वोच्च शिखरे पादाक्रांत केलेल्या प्रवासाची चित्तथरारक यशोगाथा मांडणारे लेखक शरद कुलकर्णी यंचे 'ती, मी आणि पुनश्च एव्हरेस्ट' या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह मिनी थिएटर, ठाणे येथे शनिवार, दि. १७ मे रोजी सकाळी ११ वा. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, लेखक उदय निरगुडकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.




## गँगरेप प्रकरण; फुटेज पोलिसांच्या ताब्यात

**कल्याण :** बल्याणीतील २१ वर्षीय तरुणीवर नशेचे इंजेक्शन आणि अमली पदार्थ देऊन सामूहिक बलात्कार केल्याच्या गंभीर प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसमध्ये देखील नेले असल्याचा आरोप पीडितीकडून करण्यात आल्याने राज्याच्या शासकीय यंत्रणेतील धक्कादायक दुर्लक्ष समोर आलं आहे. याप्रकरणी कल्याण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसचे सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक तपासासाठी ताब्यात घेण्यासाठी पोलीस आले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आधिकारी सुत्रांकडून माहिती मिळाली असल्याने सीसीटीव्ही फुटेज तपासणी पोलीस तपासाच्या दुष्टिकोनातून महत्त्वाचा दुवा ठरणार असे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

# पावसाळ्यापूर्वी टीएमटी बसगाड्यांच्या डागडुजीस सुरुवात

### ५१ जुन्या बसगाड्या भंगारात काढणार असल्याची प्रशासनाची माहिती

**◆ ठाणे (प्रतिनिधी):**

मागीलवर्षी टीएमटी बसगाड्यांमध्ये छत गळती होणे, तांत्रिक बिघाडमुळे रस्त्यातच बसगाडी बंद पडणे अशा अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. असे सतत होणारे प्रकार टाळण्यासाठी ठाणे परिवहन (टीएमटी) विभागाने यंदा पावसाळ्यापूर्वीच सर्व बसगाड्यांची दुरुस्ती करण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे जुन्या झालेल्या ५१ बसगाड्या भंगारामध्ये काढण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

ठाणे शहरात दिवसाला लाखो प्रवासी ये-जा करतात. शहरातील वागळे इस्टेट, घोडबंदर आणि इतर भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्या आणि लघु उद्योग तसेच खासगी कार्यालये आहेत. यामुळे विविध शहरांमधून अनेक प्रवासी कामानिमित्त ठाणे शहरात येत असतात. शहरातील अंतर्गत ठिकाणांवर रिक्षाने जाणे खर्चिक पडते. प्रवाशांना दररोज प्रवास करणे सोपे जावे म्हणुन ठाणे शहराच्या पश्चिम आणि पूर्व दिशेला ठाणे महापालिका परिवहन सेवा बस गाड्यांचा थांबा आहे. दिवसभरात अनेक प्रवासी या बसगाड्यांमधून इच्छित स्थळी जात असतात. शहरातील विविध मार्गांसह मुलुंड, बोरिवली, मीरा-भाईंदर या शहरांमध्ये ठाणे परिवहन विभागाच्या (टीएमटी) बसगाड्या धावतात. या बसगाड्यांमधून दिवसाला हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र, मागील वर्षी पावसाळ्यात टीएमटी बसगाड्यांबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तसेच बसगाड्यांमधील दुरवस्थेच्या चित्रफिती देखील समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याचे पाहायला मिळत होते.

त्याचप्रमाणे यंदा अवकाळी पावसाने हजेरी लावली या पावसात देखील बसगाड्यांमध्ये छत गळती होणे, बसगाड्या रस्त्यामध्येच बंद पडणे, विद्युत यंत्रणेत बिघाड होणे अशा अनेक समस्या समोर आल्या. असे प्रकार टाळण्यासाठी प्रशासनाने पावसाळ्यापूर्वीच तांत्रिक दुरुस्ती, इंजिन तपासणी, छताची डागडुजी, लाईट्स आणि वायरींग दुरुस्ती अशा कामांना सुरुवात केली आहे. सध्या ठाणे पालिका परिवहन(टीएमटी) ताफ्यात सुमारे ४०० हून अधिक बसगाड्या कार्यरत आहेत. यातील जुन्या असलेल्या ५१ बसगाड्यांना ऑक्टोबर २०२५ मध्ये १५ वर्षे पूर्ण होतील. यामुळे या बसगाड्या भंगारात काढल्या जाणार आहेत. तसेच इतर नविन बसगाड्यांची दुरवस्था झाल्यास लगेच त्यांची दुरुस्थी केली जाते. तसेच पावसाळ्याआधी बसगाड्यांची कामे पूर्ण केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



### बसगाड्यांचा प्रवास खिशाला परवडणारा

ठाणे महापालिकेच्या ठाणे परिवहन विभागाच्या बसगाड्यांमधून प्रवास करणे हे प्रवाशांच्या खिशाला परवडणारे आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक यांना अनेक सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रवासी बसगाड्यांचा वापर करतात. सकाळ सायंकाळच्यावेळी बसगाड्यांसाठी प्रवाशांच्या रांगाही लागतात.

### पोलीस आयुक्तांकडून प्रतिबंधात्मक आदेश जारी

# ठाणे शहरात ड्रोन उडवण्यास मनाई

**◆ ठाणे ( प्रतिनिधी):**

ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अर्थात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ठाणे पोलिसांनी ड्रोन उडविण्यास तसेच इतर मानवरहित हवाई वस्तू उडविण्यास मनाईचे आदेश दिले आहे. भारत-पाकिस्तान संघर्षानंतर मुंबई पोलिसांनी ड्रोन उडविण्यास बंदी घातल्यानंतर आता ठाणे पोलिसांनी देखील ड्रोन बंदीचे आदेश लागू केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे. शहरात काही समाजकंटकांकडून या उपकरणांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी हे प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ३ जूनपर्यंत हे आदेश लागू असतील असेही स्पष्ट करण्यात आले.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आता ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई वस्तू उडवण्यास मनाई करण्यात आली आहे. शहरात काही समाजकंटकांकडून या उपकरणांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी हे प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. ठाणे पोलीस आयुक्त कार्यालयाने याबाबत आदेश जारी केले आहेत.



या आदेशानुसार, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही व्यक्तीला ड्रोन किंवा तत्सम उपकरणे उडवण्यास मनाई असेल. हा आदेश १४ मे पासून लागू झाला असून ३ जूनपर्यंत तो अंमलात राहील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर भारतीय न्यायसंहिता २०२३च्या कलम २२३ आणि इतर लागू कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परिस्थितीचे गांभीर्य आणि तातडी लक्षात घेऊन हा आदेश तातडीने लागू करण्यात आला आहे, असेही नमूद करण्यात आले आहे. उपायुक्त (मुख्यालय-१), विशेष शाखा, ठाणे शहर, डॉ. श्रीकांत परोपकारी यांनी हे आदेश जारी केले आहेत.



नौपाडा येथील सरस्वती सेकंडरी स्कूलच्या इमारतीत अग्नी संचलन कवायत आयोजित केली होती. त्यामध्ये संस्थेच्या सेवकांना अग्नी शामक उपकरणाची प्रत्यक्ष आगीच्या प्रसंगी होणाऱ्या क्वायतीची प्रत्यक्ष सराव केला.
(छाया : अशोक घाग)

## ४१ ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे आरक्षण जाहीर

**◆ डोंबिवली (वार्ताहर) :**

कल्याण तालुक्यातील ४१ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षण जाहीर केले आहे. उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांच्या उपस्थितीत सोडत पद्धतीने हे आरक्षणे काढण्यात आली आहे. महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६४ च्या तरतुदीनुसार ही आरक्षणाची प्रक्रिया पार पाडण्यात आली. महिलांना ५० टक्के आरक्षण असल्याचे तहसीलदार सचिन शेजळ यांनी सांगितले. २०२५-२०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी हे आरक्षण लागू राहणार असल्याचेही ते म्हणाले. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ही आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. ही आरक्षणे काढताना चक्राकार पद्धतीचा अवलंब करण्यात आला. २०२५ ते २०३० या कालावधीत ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपेल तेथे त्या ग्रामपंचायतीसाठी लागू असलेले सरपंच पदाचे आरक्षण लागू केले जाणार असल्याचे तहसीलदार सचिन शेजळ यांनी सांगितले. अनुसूचित जाती, जमातीसाठी आरक्षणे काढताना उतरत्या क्रमाने गावांचा विचार करण्यात आला आहे.

## विजयनगरमधील डिव्हायडर बनलय अपघाताचे केंद्र

### चालकाचे नियंत्रण सुटून डंपर चढला डिव्हायडरवर

**◆ कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण पूर्वेकडील पूना लिंक रोड येथील विजयनगर येथे एक रेतीने भरलेला डंपर ब्रेक निकामी झाल्याने डिव्हायडरवर चढून त्याचा अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र, ही दोन महिन्यातली तिसरी घटना आहे. येथील काटे मानवली नाका ते पुना लिंक रोड, विजयनगर, तिसगाव नाका, चक्की नाका येथे मोठा उतार असल्याने अवजड वाहनांचे असे अपघात होत आहेत.

विजयनगर भागात अगदी काही दिवसांपूर्वी असाच एका ब्रेक निकामी झालेल्या मोठ्या ट्रकने ७ ते ८ वाहनांना धडक दिली होती. यात तीनजण गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा डंपरचे ब्रेक निकामी होऊन अपघात झाल्याचा प्रकार घडला. याचे कारण, या रस्त्यावर मोठा उतार असून मोठ्या अवजड वाहनांचे या रस्त्यावर ब्रेक दाबला तरी वाहन पुढे जात राहते. काटेमानिवली टेकडीचा हा चढ कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेने कापून समतोल करावा, जेणेकरून अवजड वाहनांचे अपघात होणार नाहीत. तसेच, या भागात वाहतूक पोलीस असावे अशी मागणी माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी केली आहे.



दरम्यान, वाहतूक पोलीस आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे इथे ट्राफिक वॉर्डन नेमण्याची मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र, त्यांनी आजतागायत इथे ट्राफिक वॉर्डन नेमला नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## वासंतिक बाल योग, संस्कार शिबीर उत्साहत



**◆ ठाणे (वार्ताहर) :**

बालपणापासून अंगी बाळगलेली शिस्त आणि संस्कार यांचे नाते अतूट असते आणि ते अनमोल असते असे बाल मनाला भावणारे भावनिक मनोगत योग मास्टर छाया सॅलियन यांनी व्यक्त केले. श्री आनंद भारती व्यायामशाळा आणि श्री अंबिका योग कुटीर यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही आयोजित करण्यात आलेल्या वासंतिक बाल योग व संस्कार शिबिराच्या समारोप समारंभात छाया सॅलियन बोलत होत्या.

श्री आनंद भारती समाज सभागृहात विनाशुल्क पार पडलेल्या या शिबिरात ५० हून अधिक जणांचा सहभाग लाभला. समारोप समारंभ प्रसंगी आनंद भारती समाज संस्थेचे अध्यक्ष हरेश्वर मोरेकर, कार्याध्यक्ष ओमप्रकाश धिरोलीया, खजिनदार विवेक मोरेकर, योगशिक्षक प्रवीण धुरी, डॉ दिलीप नाखवा आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कल्पक कोळी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या शिबिरात य. ल. नाखवा आणि द. पा. नाखवा स्मृती सप्ताहानिमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यात ७५ मीटर धावण्याच्या स्पर्धेत शिवन्या भुजबळ, प्रचिती गायकवाड, यश गोपी दयाल, अंश कोळी, अनय नाखवा तर स्मरणशक्ती स्पर्धेत देवश्री कोळी, अनय नाखवा, काव्या पुसाळकर, आणि चित्रकला स्पर्धेत पियूश्री कोळी, निषिता उल्हाळकर, काव्या पुसाळकर, तनिष शिरकर विजयी होते.

## कल्याणमध्ये भरणार आगरी बोली प्रशिक्षण वर्ग

**कल्याण :** मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, पालघरमधील स्थानिकांची बोली म्हणजे आगरी बोली. अनेकांना या भाषेचे नेमके पैलू माहीत नाहीत. आगरी बोलीचा वापर हा कमी होत आहे. यावर उपाय म्हणून ज्यांना आगरी बोली शिकायची आहे वा अधिक माहिती मिळवायची आहे त्यांच्यासाठी भुमिपुत्र फाऊंडेशचे अध्यक्ष सुशांत पाटील आणि आगरी ग्रंथालय चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७, २८ मे रोजी ठाण्यात टाऊन हॉल येथे 'आगरी शाला' या २ दिवसांच्या आगरी बोलीचे प्रशिक्षणवर्ग घेण्याचे ठरविले आहे. या 'आगरी शाला'अंतर्गत सहभागी आगरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी लघु पाठ्यक्रम असलेले पुस्तकही मिळणार आहे. ज्यात आगरी बोलीतील पद्य, गद्य चा समावेश असेल. या प्रशिक्षणासाठी आगरी भाषा प्रेमींनी सहभाग घ्यावा असे युवा साहित्यिक सर्वेश तरे यांनी आवाहन केले आहे.

## पुना लिंक रोडवरील अपघात टाळण्यासाठी १०० फुटी रस्ता सुरू करण्याची मनसेची मागणी

**◆ कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोड येते अवजड वाहनांचे ब्रेक फेल होऊन अपघात होण्याच्या घटना वाढल्या असून या रोडवर होणारे अपघात टाळण्यासाठी १०० फुटी रस्ता सुरू करण्याची मागणी मनसेने केली असून याबाबत मनसेचे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे.

कल्याण पूर्व परिसरातील १०० फुटी रोड हा कल्याण पूर्व परिसरातील पुना लिंक रोडवरील वाहतूक कमी करण्यासाठी एक महत्त्वाचा पर्याय आहे; परंतु हा रस्ता गेले कित्येक वर्ष प्रलंबित आहे. या रस्त्याचे बहुतांश काम हे पूर्ण झाले आहे. १०० फुटी रस्ता पूर्ण करून घेतला तर कल्याण पूर्वमधील गेले काही महिने सातत्याने मोट्या गाडीचे अपघात होत आहेत,



सुदैवाने शाळांना सुट्टी असल्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी होत नाहीये. १०० फुटी रस्ता पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला झाल्यास पुनालिंक रस्त्यावरील मोठ्या जड वाहनांची वाहतूक १०० फुटी रस्तावर वळवून होणारे अपघात कमी होऊ शकतात. तरी १०० फुटी रस्ता हा पुनालींक रोड रस्त्याला रहदारीस पर्याय म्हणून होऊ शकतो. कल्याण पूर्वमधील पुना लिंक रोड वरील होणारे जीवघेणे अपघात कमी होतील. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी मनसेचे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी केली आहे.

## आयरेतील बेकायदा राघो हाईट्सवर कारवाईस रहिवाशांचा विरोध

### २० पोलीस असताना कारवाई न करताच तोडकाम पथक माघारी

**◆ डोंबिवली(प्रतिनिधी):**

डोंबिवली पूर्वेत आयरे गावातील बेकायदा राघो हाईट्स ही इमारत तोडण्यास पालिकेच्या ग प्रभागाचे तोडकाम पथक गेले होते. रामनगर पोलीस ठाण्याचे २० पोलीस यावेळी बंदोबस्तासाठी होते. जेसीबी आणि तोडकाम पथक घेऊन साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत बेकायदा राघो हाईट्स इमारतीजवळ पोहचताच, अगोदरच सज्ज असलेल्या रहिवाशांनी पालिकेच्या तोडकाम पथकाला अडविले आणि कारवाईस विरोध केला.



अगोदर आमचे पुनर्वसन करा, मगच तुम्हाला काय करायचे ते करा,अशी आक्रमक भूमिका रहिवाशांनी घेतली. विरोध करण्यास महिला वर्ग आघाडीवर होता. साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी रहिवाशांना कारवाई करण्यासाठी बाजूला होण्यास सांगितले. रहिवासी काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हते. सामाजिक कार्यकर्त्या मनीषा राणे यांनी राघो हाईट्स इमारतीत गोरगरीब रहिवासी राहतात. या रहिवाशांना आम्ही कोणत्याही परिस्थितीत बेघर होऊ देणार नाही. ही इमारत सुरू होती त्यावेळी ही इमारत पालिका अधिकाऱ्यांना, तक्रारदारांना दिसली नाही का, असे प्रश्न राणे यांनी केले. बुधवारच्या कारवाईसाठी पोलीस बळ मिळण्यासाठी आपण स्वतः पोलीस आयुक्त, उपायुक्त यांच्या भेटी घेतल्या, असे तक्रारदार पाटील यांनी सांगितले. राघो हाईट्सच्या प्रवेशव्दारावर रहिवाशांनी ठिय्या मांडून कारवाईवाला विरोध केला. संध्याकाळपर्यंत हा विरोध कायम राहिल्याने पालिका तोडकाम पथक रिकाम्या हाताने माघारी परतले. विरोध करणाऱ्यांवर सरकारी कामात अडथळ्याचा गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. राघो हाईट्स या बेकायदा इमारतीचे मूळ क्षेत्र २१० चौरस मीटर असताना ते बनावट कागदपत्रांच्या आधारे ४०० चौरस मीटर करण्यात आले आहे. या इमारतीसाठी ग्रामपंचायतीची काही जमीन हडप करण्यात आली आहे. पालिकेच्या एका वरिष्ठाने पुढील आठवड्यात या इमारतीवर कारवाईचे आश्वासन तक्रारदाराला दिले आहे.

### तलाव बुजवणाऱ्या जेसीबीसह एकजण ताब्यात

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात अतिक्रमणाचा प्रकार उघड

**◆ ठाणे ( प्रतिनिधी):**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात दिवसेंदिवस अतिक्रमणाच्या घटना वाढत असून, त्यामुळे जैवविविधतेला आणि वन्यजीवांच्या अधिवासाला मोठा धोका निर्माण झाला आहे. येऊर परिसरातील चेना वन परिक्षेत्रात अलीकडेच एका तलावात बेकायदेशीररीत्या दगड व माती भरून तो बुजवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती वन विभागाला मिळताच त्यांनी तातडीने कारवाई केली.

ही घटना मौजे ओवळा येथील राखीव वनक्षेत्रात घडली असून, येथे सर्वे नंबर २७३/३ आणि वनखंड क्रमांक १०९ मध्ये असलेल्या नैसर्गिक तलावात जेसीबीच्या सहाय्याने माती व दगड टाकले जात होते. यामुळे या जलस्रोताचा नाश होण्याची शक्यता होती. अशा प्रकारे तलाव बुजवून भविष्यात तेथे बांधकाम अथवा इतर वापरासाठी जमिनीचा वापर होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता वन विभागाने कठोर भूमिका घेतली आहे.



या प्रकरणी उपसंचालक प्रदीप पाटील आणि सहाय्यक वनसंरक्षक करिश्मा कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली वन पथकाने कारवाई केली. त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन तलाव बुजवणाऱ्या जेसीबी मशीनला रोखले व सर्वजित यादव (वय ३१) या व्यक्तीला ताब्यात घेतले असल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी मयूर सुरवसे यांनी दिली. वन विभागाच्या कारवाईमुळे परिसरात अशा अतिक्रमणकारांमध्ये धडकी भरली असून, येऊर परिसरात सध्या वाढत्या अतिक्रमणामुळे जैवसाखळी विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. जंगलातील जलस्रोत हे वन्यजीवांसाठी जीवनरेषा असून, त्यांचा नाश होणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वावरच संकट ओढावणे होय.

वन विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली असून, दोषींवर वन अधिनियमांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## 'नागरी वस्तीतील गॅस सिलिंडर गोडाऊनची मान्यता रद्द करा'

**◆ कल्याण (प्रतिनिधी):**

ठाणे जिल्ह्यातील कल्याण व उल्हासनगर शहरात शेकडो लोकांचे जीव धोक्यात घालून नागरी वस्तीमध्ये गॅस सिलिंडर गोडाऊन चालविणारे गॅस एजन्सीची मान्यता रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

गॅस एजन्सी मालकाला गॅस गोडाऊन रहिवासी वस्तीपासून लांब ठेवण्याच्या अटी व शर्तीवर गॅस परवाना दिला जातो; परंतु पळवाट म्हणून नियमाचे पालन करण्यासाठी एक गोडाऊन शहराच्या बाहेर ठेवले जाते व दुसरे शहराच्या रहिवासी वस्तीमध्ये ठेवले जाते. असाच एक प्रकार समोर आला आहे. कल्याण शहरातील हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस एजन्सी मालकाने त्यांचे अधिकृत गॅस गोडाऊन मोहने टिटवाळा परिसरात असल्याकारणाने त्यांना ट्रान्सपोर्टेशन महाग पडत असल्याने त्यांनी सिलिंडर सप्लायसाठी एक अनधिकृत गोडाऊन रहिवासी वस्तीत कल्याण पश्चिम येथील डीबी चौक परिसरात कार्यरत ठेवले आहे. तसेच उल्हासनगर येथील हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस एजन्सी मालकाने आपले सिलेंडर सप्लायसाठी गोडाऊन शान्तीनगर,उल्हासनगर ३ मध्ये भर रहिवासी वस्तीत थाटले आहे. जे कायद्याने मोठा गुन्हा असून या रहिवासी परिसरात जर कदाचित सिलेंडर स्फोट झाला तर शेकडो निष्पापांचे जीव जाण्याचा धोका आहे. तरी या विषयांची सखोल चौकशी करून गॅस एजन्सी मालकावर कठोर कारवाई करून गुन्हा नोंदवून गॅस एजन्सीचे परवाना रद्द करण्याची मागणी साळवे यांनी केली आहे.



# निकालात गरुडभरारी, ॲडमिशनचे काय?

दहावी-बारावीचे निकाल लागले आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदा सावित्रीच्या लेकीच हुशार ठरल्याने मुलांहून त्यांचा टक्केवारीचा आकडा अधिक ठरला आहे. गेल्या काही वर्षांत पिछाडीवर पडलेल्या लातूर पॅटर्नने पुन्हा एकदा महाराष्ट्रात मुसंडी मारली आहे. महाराष्ट्राच्या अर्थकारणात हापूस आंबा सोडला, तर परशूरामाच्या कोकण भूमीची फारशी दखल घेतली जात नसली तरी गुणवत्तेच्या व बुद्धीमत्तेच्या बाबतीत गेली १५ वर्षे महाराष्ट्रामध्ये कोकण मंडळाने दहावीच्या निकालामध्ये आपला प्रथम क्रमांक सोडलेला नाही, ही कोकणवासीयांसाठी नक्कीच अभिमानाची, भूषणावह बाब आहे. महाराष्ट्रातल्या अन्य भागातल्या मुलांपेक्षा कोकणची मुले खरोखरीच हुशार असतात, हे त्यांनी दहावीच्या निकालामध्ये एक-दोन नव्हे, तर सलग चौदा-पंधरा वर्षे दाखवून दिले आहे. पुण्याला विद्येचे माहेरघर संबोधले जाते. मुंबई शहर, उपनगरात अधिकाधिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध असतानाही कोकणची मुले सातत्याने दहावीच्या निकालामध्ये प्रथम क्रमांक पटकावत आहेत. राज्यात नऊ विभाग असताना पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर या आठ विभागांना गेल्या १४-१५ वर्षांत एकदाही प्रथम क्रमांक मिळवून दिलेला नाही, याबाबत कोकण मंडळातील विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे खरोखरीच अभिनंदन केले पाहिजे. या वर्षी दहावीचा राज्याचा निकाल ९४.१० टक्के एवढा लागला आहे, तर कोकण विभागाने पहिला नंबर घेतला असून कोकण विभागाचा ९९.८२ टक्के एवढा निकाल लागला आहे. या वर्षी दहावीच्या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात मुले नेत्रदीपक यश एकीकडे मिळवत असताना तब्बल ४९ शाळांचा शून्य टक्के निकाल लागला आहे, याकडेही कानाडोळा करून चालणार नाही. या ४९ शाळांमध्ये नाशिकच्या ४, पुण्यातील ७, नागपूरच्या ८, संभाजीनगरच्या ९, मुंबईच्या ५, अमरावती ४, लातूरच्या १०, कोकण व कोल्हापूरच्या एका शाळेचा समावेश आहे. याशिवाय, २८५ विद्यार्थ्यांना केवळ ३५ टक्के गुण मिळाले, ज्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काही वर्षांपूर्वी गुणवत्ता यादी प्रकाशित व्हायची, ही गुणवत्ता यादी त्या-त्या विभागनिहाय प्रसिद्ध होत असे. तथापि बोर्ड परीक्षेत आलेल्या अपयशामुळे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या स्पर्धात्मक भीतीमुळे आत्महत्यांचे प्रमाणही वाढू लागले. त्यानंतर गुणवत्ता यादी लावण्याचा प्रकारच बंद करण्यात आला. या वर्षी परीक्षेमध्ये कॉपी प्रकार होऊ नये यासाठी सरकार, मंडळ व पोलीस विभागांकडून जोरदार प्रयत्न झाले. काटेकोर उपाययोजना करूनही काही ठिकाणी कॉपी करण्याच्या घटना घडल्याच, त्या परीक्षा केंद्रांवर बोर्डाकडून कारवाईची प्रक्रिया सुरूच आहे. वाढत्या निकालामुळे शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्साहाचे वातावरण असले तरी या यशामागे एक चिंतेची झालरही दडलेली आहे. मुलांनी यशाची शिखरे दहावीच्या निकालामध्ये पादाक्रांत केली असली तरी पुढे मुलांच्या ॲडमिशनचे काय? या चिंतेचे सावट विद्यार्थ्यांसह पालकवर्गाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे उमटू लागले आहे.

पूर्वीच्या तुलनेत निकालाचा आलेख अलीकडच्या काळात उंचावत चालला आहे. पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश मिळविताना फारशा अडचणी येत नसायच्या. बदलत्या काळात ॲडमिशनचे चित्र बदलत चालले आहे. काही काळापूर्वी निकाल लागल्यावर महाविद्यालयाच्या प्रांगणात ॲडमिशनसाठी विद्यार्थ्यांच्या रांगा लागायच्या. ॲडमिशनसाठी मुले किमान तीन ते चार कॉलेजचे ॲडमिशन अर्ज भरून ठेवायचे, जिथे प्रवेश मिळेल, तिथे आवडीनुसार प्रवेश घेऊन मोकळे व्हायचे. कॉलेजची संख्या वाढत असली तरी तुलनेने विद्यार्थ्यांचीही संख्या वाढत चालली आहे. उत्तीर्ण होण्याचे प्रमाणही वाढत चालले, केवळ उत्तीर्णच नाही तर मिळालेली टक्केवारीदेखील किमान ७०, ७५, ८०, ८५च नाही तर ९० टक्क्यांच्याही पुढे जाऊ लागली आहे. पूर्वीच्या काळात विद्यार्थ्यांना ६० टक्के मिळाले तरी फर्स्ट क्लासने मुलगा-मुलगी पास झाली, असे पालकांकडून अभिमानाने सांगितले जात असे. विद्यार्थ्यांने ७५ टक्क्यांच्यापुढे अधिक गुण मिळविले, तर मुलाला-मुलीला डिस्टीक्शन मिळाले, सांगताना पालकांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद असायचा. पण आताच्या काळात सरसकटपणे अधिकाधिक मुलांना जवळपास ८० टक्क्यांच्या पुढेच गुण मिळू लागल्याने फर्स्ट क्लास, डिस्टिक्शन हे शब्दच कालबाह्य ठरू लागले आहे. ८५, ९०, ९५ टक्के पडले, असेच आता कानावर पडत आहे. विद्यार्थ्यांना चांगले मार्क मिळत असल्याने व पूर्वीच्या तुलनेत विद्यार्थी संख्याही वाढल्याने आता प्रवेशासाठी सातवी-आठवी यादी प्रकाशित होऊ लागली आहे. आता ॲडमिशनसाठी अर्ज भरा, हव्या असलेल्या महाविद्यालये, विद्यालयांची दहा-पंधरा नावे टाका, मिळेल त्या महाविद्यालयात प्रवेश घ्या असा प्रकार सुरू झाला आहे. ९० टक्केच्या पुढे गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना रुपारेल, रुईया, झेविअर्स, झुणझुणवाला, सौमय्या आदी महाविद्यालयांमध्ये प्रवेश हवा असतो. वाणिज्य शाखेत जाऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना पोद्दार कॉलेजमध्ये प्रवेश हवा असतो. अभियांत्रिकीमध्ये करिअर करू पाहणाऱ्यांना व्हीजेटीआयमध्ये प्रवेश हवा असतो. इच्छा काही असली तरी गुणवत्तेची टक्केवारी सागरांच्या लाटांप्रमाणे उसळी घेऊ लागल्याने प्रवेशासाठीची चौथी-पाचवी यादीदेखील आता ७५ टक्केच्या आसपास येऊ लागली आहे. ६० ते ६५ टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना आठव्या प्रवेशयादीची वाट पाहण्याची वेळ आली आहे. शहरी भागातील मुलांचा सायन्स, कॉमर्स व अभियांत्रिकीकडे अधिक कल असतो. ग्रामीण भागातील मुलांचे अर्थकारण आजही जुजबी असल्याने आयटीआयचा कोर्स करून पुणे, नाशिकसारख्या भागात विस्तारू पाहणाऱ्या कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून घरांचा आर्थिक भार उचलण्याकडे भर असतो. ॲडमिशनची प्रक्रिया आता वाढत्या गुणवत्तेमुळे त्रासदायक व तापदायक ठरू लागली आहे. कल्याण-डोंबिवली, बदलापूर अगदी पनवेलच्या मुलांचाही ८५ ते ९० टक्के गुणांच्या आधारावर मुंबईतील कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याचा भर असतो. यामुळे सुरुवातीची दीड महिने अपेक्षित कॉलेजमध्ये ॲडमिशनसाठी धावाधाव केल्यावर पदरी यश मिळत नसल्यावर यादीमध्ये जे कॉलेज येईल. तिथे प्रवेश विद्यार्थी घेत असतात. यशाची वाढती टक्केवारी हव्या असलेल्या कॉलेजच्या ॲडमिशनसाठी माफक नसल्याने इतक्या गुणांचा काय फायदा असे नैराश्येने बोलण्याची वेळ पालकांवर व विद्यार्थ्यांवर येत असते.

# ऑपरेशन सिंदूर : आधुनिक युद्धतंत्रातील निर्णायक विजयश्री

भारताने ऑपरेशन सिंदूर समाप्त झाल्याचे अद्याप जाहीर केलेले नाही. मोहिमेमध्ये घेतलेला एक संवेदनशील विराम म्हणून या स्थितीकडे बघता येईल. काहीजण याला युद्धविराम असेही संबोधतील, मात्र लष्करातील प्रमुख अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून तो शब्द टाळला आहे. युद्धसंघर्षाच्या दृष्टिकोनातून हा केवळ एक अल्पविराम नव्हे, तर एका दुर्मीळ आणि निःसंदिग्ध यशानंतरची लष्कराची ही एक धोरणात्मक पकड आहे. भारताने मोठा विजय मिळवला आहे. हे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने केलेल्या लष्करी कारवाईच्या केवळ चार दिवसांनंतर दिसणारे एक निर्णायक सत्य आहे. ऑपरेशन सिंदूरने दहशतवादी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करणे, आपले लष्करी सामर्थ्य दाखवणे, शत्रूला पुन्हा अशी कारवाई करण्यापासून परावृत्त करणे आणि राष्ट्रीय सुरक्षेचा नवीन सिद्धांत आखणे ही आपली धोरणात्मक उद्दिष्टे पूर्ण करतानाच त्याही पलीकडे यश प्राप्त केले आहे.

भारतावर हल्ला झाला. २२ एप्रिल २०२५ रोजी, जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे हत्याकांड घडवून आणण्यात आले. यात २६ भारतीय नागरिकांची, बहुतांश हिंदू पर्यटकांची हत्या करण्यात आली. पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबा (एलईटी)ची शाखा असलेल्या रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ)ने या कृत्याची जबाबदारी स्वीकारली. गेल्या अनेक दशकांप्रमाणे चालत आल्यानुसार, या गटाला पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (ISI)चा पाठिंबा आहे. मात्र गेल्या काही हल्ल्यांप्रमाणे भारताने यावेळी प्रतीक्षा केली नाही. यावेळी भारताने आंतरराष्ट्रीय मध्यस्थींची विनंती केली नाही किंवा एखाद्या राजनैतिक हस्तक्षेपाची अपेक्षा केली नाही, तर भारताने विमाने डागली. ७ मे रोजी भारताने एक अत्यंत गतिमान आणि अचूक नियोजनबद्ध लष्करी मोहीम अर्थात 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानमध्ये असलेल्या नऊ दहशतवादी तळांना लक्ष्य केले, ज्यामध्ये 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'लष्कर-ए-तैयबा' सारख्या दहशतवादी संघटनांचे मुख्य अड्डे आणि कारवायांच्या केंद्रांचा समावेश होता. यातून एक स्पष्ट संदेश गेला की, पाकिस्तानी भूमीवरून होणारे दहशतवादी हल्ले आता युद्ध म्हणून मानले जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन सिद्धांत आखला आहे, 'भारत कोणत्याही आण्विक ब्लॅकमेलला भीक घालणार नाही. आण्विक ब्लॅकमेलच्या आडून फोफावणाऱ्या दहशतवादी अड्ड्यांवर भारत अचूक आणि निर्णायक हल्ला करेल'. ही भावना प्रतिशोधापेक्षाही अधिक एका धोरणात्मक सिद्धांताची स्पष्ट आणि निर्भयपणे केलेली मांडणी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे, दहशतवाद आणि व्यापार एकत्र चालू शकत नाहीत. पाणी आणि रक्त हे देखील एकत्र वाहू शकत नाही.

ऑपरेशन सिंदूर नियोजनबद्ध टप्प्यांमध्ये राबवण्यात आले. ७ मे या दिवशी पाकिस्तानच्या हद्दीत खोलवर नेमके नऊ अचूक हल्ले करण्यात आले. यामध्ये बहावलपूर, मुरीदके, मुझफ्फराबाद आणि इतर ठिकाणी असलेल्या प्रमुख दहशतवादी प्रशिक्षण शिबिरे आणि पायाभूत सुविधांचा समावेश होता. ८मे ला पाकिस्तानने भारताच्या पश्चिमेकडील राज्यांवर मोठ्या प्रमाणात सोडलेल्या ड्रोनने प्रत्युत्तर दिले. भारताच्या स्वदेशी बनावटीच्या आणि रशिया आणि इस्रायलच्या तंत्रज्ञानाने




विकसित केलेल्या बहुस्तरीय हवाई संरक्षण नेटवर्कने या ड्रोनना हवेतच नेस्तनाबूत केले. ९ मे ला भारताने सहा पाकिस्तानी लष्करी हवाई तळांवर आणि यूएव्ही समन्वय केंद्रांवर अतिरिक्त हल्ले करून या कारवाईचे स्वरूप तीव्र केले. १० मे ला कारवाईला तात्पुरती स्थगिती देण्यात आली. भारताने याला कधीही युद्धविराम असे संबोधले नाही. भारतीय लष्कराने याला 'गोळीबाराला तात्पुरती स्थगिती' असे म्हटले आहे. हा एक अर्थपूर्ण आणि जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय होता. ज्यामुळे आपले परिस्थितीवरील धोरणात्मक नियंत्रण अधिक मजबूत झाले. हा केवळ एक रणनैतिक विजय नव्हता, तर चालू युद्धातील सैद्धांतिक अंमलबजावणी होती.

**जॉन स्पेन्सर**

**साध्य झालेली धोरणात्मक उद्दिष्टे :**

१) एक नवीन मर्यादारेषा आखली गेली आणि ती लागू झाली. पाकिस्तानच्या भूमीतून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांना आता संरक्षण दलांना तोंड द्यावे लागेल. ही काही धमकी नाही, तर दाखला आहे.

२) लष्करी सामर्थ्याचे दर्शन भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी अड्डे, समन्वय केंद्र आणि वेळ आल्यास हवाईतळ यांसारख्या कोणत्याही ठिकाणाचा आपल्या अटीशर्तीनुसार लक्ष्यभेद करण्याची क्षमता दाखवून दिली. दरम्यान, पाकिस्तानला भारताच्या आत एकाही संरक्षित क्षेत्रात प्रवेश करता आला नाही. यात कुठेही साम्य नाही, तर श्रेष्ठत्व आहे आणि अशाप्रकारे दहशतवादी कृत्यांवर खरा वचक बसेल.

३)दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी भारताने जगाला एक नवीन मार्ग दाखवला भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले पण पूर्ण युद्ध न होता ते थांबले. मात्र असे असले तरी भारताच्या वाढत्या नियंत्रणामुळे एक स्पष्ट प्रतिबंधक संकेत मिळाला आणि तो म्हणजे : भारत प्रत्युत्तर देईल आणि वेग मर्यादा देखील भारतच ठरवेल.

४) ठाम धोरणात्मक स्वातंत्र्य भारताने ही घटना कोणत्याही आंतरराष्ट्रीय मध्यस्थीशिवाय हाताळली. भारताने सार्वभौम मार्गांचा वापर करून, सार्वभौम अटींवर सिद्धांत लागू केला.

ऑपरेशन सिंदूर हे काही बळकावणे किंवा राजवट बदलण्यासाठी नव्हते, तर हे काही विशिष्ट कालमर्यादेसाठी आणि ठराविक उद्दिष्टांसाठी पुकारलेले युद्ध होते. भारताने हा लढा आणखी पुढे न्यायला हवा होता असा युक्तिवाद करणारे टीकाकार एक मुद्दा विसरतात. धोरणात्मक यश हे विध्वंसाच्या प्रमाणावर अवलंबून नसते, तर ते इच्छित राजकीय परिणाम साध्य करण्यावर अवलंबून असते. भारत काही सूड घेण्यासाठी लढत नव्हता, तर त्यांना पायबंद करण्यासाठी लढत होता आणि त्याचा खरोखरच परिणाम झाला. भारताचा संयम हा भारताचा कमकुवतपणा नव्हे, तर त्याची प्रगल्भता आहे. भारताने शत्रूला किंमत मोजायला लावली, त्यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या आणि आपले प्रभुत्व सिद्ध केले. भारताने धोरणात्मक समीकरणे बदलली. एका अशा युगात जिथे आधुनिक युद्ध अनेक नवीन आव्हानांत आणि राजकीय संभ्रमात परावर्तित होतात, त्या युगात ऑपरेशन सिंदूर वेगळे दिसते. यामध्ये स्पष्ट उद्दिष्टे, शिस्तबद्ध लष्करी धोरण, सुसंबद्ध मार्ग आणि साधने आणि अंदाज लागणार नाही अशा कठीण परिस्थितीला तोंड देताना अनुकूल अंमलबजावणी या गोष्टींचा समावेश आहे. भारताने एक धक्का सहन केला, स्वतःचे उद्दिष्ट निश्चित केले आणि ते साध्य केले आणि ते ही एका मर्यादित वेळेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये केलेल्या बळाचा वापर प्रचंड असला तरी तो नियंत्रित, अचूक, परिणामकारक आणि कोणताही संकोच न करता केला होता. आधुनिक युद्धांमध्ये अशाप्रकाची स्पष्टता दुर्मीळ आहे. 'कायमस्वरूपी युद्ध' आणि धोरणात्मक दिशा नसलेल्या हिंसाचाराच्या चक्रांनी व्याप्त युगात, ऑपरेशन सिंदूरचे वेगळेपण दिसून येते. हे एका मर्यादित युद्धाचे मॉडेल मांडते ज्याचा शेवट स्पष्टपणे परिभाषित केला आहे, पद्धत आणि मार्ग यांचा मेळ घालून आपणहून पुढाकार न घेण्याच्या वृत्तीचे दर्शन यातून घडते.

२००८ मधील भारताने हल्ले सहन केले आणि वाट बघितली. आताचा भारत फिरून प्रहार करणारा आहे तोही लगेच, अचूकपणे आणि अतिशय स्पष्टपणे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सिद्धांत, भारताच्या आधुनिक देशांतर्गत संरक्षण उद्योगाची वाढती व्याप्ती आणि भारताच्या सशस्त्र दलांची व्यावसायिकता या सर्वांमधून हेच दिसते की भारत आता शेवटच्या युद्धाची नव्हे, तर पुढील युद्धाची तयारी करत आहे. या ऑपरेशनमधील विराम हा ऑपरेशन सिंदूरचा शेवट नाही. हा एक विराम आहे. भारताने पुढाकार घेतला आहे. जर पुन्हा चिथावणी दिली, तर पुन्हा हल्ला केला जाईल. दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी भारताने जगाला एक नवीन मार्ग दाखवला आहे. हा एक नवीन सिद्धांत जगासमोर आला आहे. राष्ट्र-पुरस्कृत दहशतवादाच्या संकटाचा सामना करणाऱ्या सर्व राष्ट्रांनी याचा अभ्यास केला पाहिजे. ऑपरेशन सिंदूर हे एक आधुनिक युद्ध आहे. आण्विक युद्धाच्या सावलीत, जागतिक स्तरावर लक्ष वेधून आणि मर्यादित वस्तुनिष्ठ चौकटीत लढले गेलेले आणि प्रत्येक बाबतीत महत्त्वाचे म्हणजे ते एक धोरणात्मक यश होते आणि एक निर्णायक भारतीय विजय होता.

**लेखक : अर्बन वॉरफेअर इन्स्टिट्यूटचे कार्यकारी संचालक आहेत (ते अंडरस्टँडिंग अर्बन वॉरफेअर'चे सह-लेखकही आहेत)**

# विवरणपत्र भरण्याची तयारी

आपले सर्व मार्गाने होणारे उत्पन्न आणि त्यावर भरलेला कर करदात्याने प्रमाणित करणे म्हणजे आयकर विवरणपत्र भरणे. कायद्यानुसार विशिष्ट उत्पन्न अथवा काही अटी पूर्ण करणाऱ्या सर्वांना आयकर विवरणपत्र भरणे सक्तीचे आहे. ज्या करदात्यांना आपले आयकर विवरणपत्र भरताना हिशोब प्रमाणित करावे लागत नाहीत त्यांना सन २०२४-२५ या वर्षाचे आपले आयकर विवरणपत्र दंड न भरता सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ आहे. ज्यांना आयकर कायद्यानुसार हिशोबांना मान्यता घ्यावी लागते त्यांच्यासाठी हीच तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ आहे. गेले काही वर्षे ३१ जुलै ही मुदत वाढवली गेलेली नाही. त्यामुळे यंदा ती कदाचित वाढवली जाऊ शकते या भ्रमात कोणी राहू नये. मुदतीत विवरण पत्र न भरल्याने दंड द्यावा लागून काही अनेक महत्त्वाच्या आयकर सवलतींवर पाणी सोडावे लागते. तेव्हा आपले विवरणपत्र दिलेल्या मुदतीत भरल्याने दंड वाचतोच, शिवाय करविषयक काही सवलती मिळतात. १ एप्रिल २०२५ पासून आपल्याला दिलेल्या मुदतीत आयकर विवरणपत्र दाखल करता येत असले तरी अनेक तांत्रिक कारणाने ते भरता येत नाही. त्यातील काही कारणे अशी शेवटच्या तिमाहीत मुळातून कापलेला कर हा ज्याने कापला आहे त्याला १५ मे पर्यंत भरता येतो. अनेक कंपन्या तो अगदी शेवटच्या क्षणी भरतात. आपल्या २६AS अथवा AIS वर दिसायला अजून काही दिवस लागू शकतात. आता सर्व करभरणा ऑनलाइन होत असताना हा तपशील दिसण्यात खरं तर एक दिवसाहून अधिक कालावधी लागायला नको. आयकर खात्याने या संदर्भात तातडीने काहितरी करून हा विलंब टाळण्याची गरज आहे.



**उदय पिंगळे**
मुंबई ग्राहक पंचायत

अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांना कायद्याने देणे आवश्यक असा फॉर्म १६ मे अखेर ते अगदी १५ जूनपर्यंत देतात त्यामुळे आपले नक्की उत्पन्न किती, करकपात किती आणि विविध कलमानुसार घेतलेली आयकर सवलत किती ते नक्की समजत नाही. अनेक व्यावसायिक संस्थांचे जमाखर्च तपासून त्याला मान्यता मिळणे आवश्यक असते, असे असले तरीही ज्यांचे करपात्र उत्पन्न विहित मर्यादेहून कमी आहे, ज्यांचा कर मुळातून कापला जात नाही आणि ज्यांना भांडवली नफा या सदराखाली काही उत्पन्न असेल/ नसेल असे करदाते आपले उत्पन्न मोजून ताबडतोब आयकर विवरणपत्र भरू शकतात. आयकर विवरणपत्र दाखल करायचे विविध फॉर्म आहेत. दरवर्षी विभागाकडून त्यात किरकोळ बदल होत असतात. आपण आपल्या कराची मोजणी दोन प्रकारे करू शकतो. त्याचप्रमाणे व्यवसाय उत्पन्न नसेल, तर मोजणी करण्याच्या पद्धतीत सोईनुसार बदल करू शकतो. या शिवाय आयकर विवरणपत्र भरण्यासाठी उपयुक्त गोष्टी जसेकी, पॅन, आधार, पासवर्ड, बँक खाते तपशील, बचत गुंतवणूक केली असल्यास त्याचे तपशील, व्याज प्रमाणपत्र, गृहकर्ज मूद्दल व्याज यांची विभागणी, मेडिक्लेम भरल्याची पावती, मिळालेल्या दिलेल्या भेटवस्तू, क्रेडिट कार्ड व्यवहार, स्थानिक स्वराज्य संस्थेचा भरलेला कर, करमुक्त उत्पन्नाचा तपशील, भागीदारी करार, लीज करार, मोठ्या रकमेच्या व्यवहाराचे तपशील, देणगी दिली असल्यास त्याचा तपशील बोनस, राईट, मर्जर, डीमर्जर, खरेदीविक्रीची बिले या सारखी आपल्या उत्पन्नाच्या संबंधित आवश्यक ती माहिती हाताशी ठेवावी म्हणजे आयत्याक्षणी धावपळ करावी लागत नाही. या आर्थिक वर्षात भांडवली नफा वेगवेगळ्या कार्यकालासाठी वेगवेगळ्या दराने लागत असल्याने आयटीआर तीनमध्ये त्यांची मोजणी आणि करदेयता वेगवेगळी दाखवावी लागेल. त्याचप्रमाणे १ ऑक्टोबर नंतर शेअर कंपनीने शेअरहोल्डरकडून खरेदी केले असतील, तर मिळालेली रक्कम लाभांश म्हणून आणि मूळ शेअर्स खरेदी करण्यास लागलेली रक्कम भांडवली तोटा म्हणून दाखवावी लागेल. त्याचप्रमाणे एक कोटी रुपयाहून अधिक मालमत्ता आणि दायित्वे असल्यास त्याचाही तपशील द्यावा लागेल त्याप्रमाणे नवीन फॉर्म तयार करण्यात आला असून तो संबंधिताना उपलब्ध आहे. याप्रमाणे फॉर्म भरण्यास आवश्यक तपशील हाताशी असल्यास आयकर विवरणपत्र भरणे सोपे जाते. आपल्याला विवरणपत्र भरता येत नसल्यास तज्ज्ञ व्यक्ती/ संस्था यांची मदत घ्यावी.

अनेकदा आपण जाणकार समजत असलेली व्यक्ती यात जाणकार असतेच असे नाही तेव्हा आपण माहिती असल्यास स्वतः अचूक मोजणी करून द्यावी आणि संबंधित व्यक्तीस समजावून सांगावी त्याने विवरणपत्र दाखल करण्यापूर्वी तपासून आपण पाहावी. अनावधानाने यात संबंधित व्यक्तीकडून चूक झाल्यास त्याची सर्व जबाबदारी करदात्यांवर येते. त्याला दंड होतो याशिवाय मनस्ताप होतो तो वेगळाच. काही व्यावसायिक फर्म यासारख्या सेवा फी आकारून आपल्या ग्राहकांसाठी करीत असतात त्यांची मदत घेता येईल. एवढी पुरेशी काळजी घेऊनही काही जाहीर करायचे राहिले असल्यास विवरणपत्र ३१ डिसेंबरपर्यंत (जरी ते मंजूर झालेले असले / नसले तरी) दुरुस्त करता येते.

## आपल्याला नेमका कोणता फॉर्म लागेल आणि तो भरण्यासाठी कोणत्या गोष्टी हाताशी ठेवल्या, तर सोयीचे होईल याची माहिती घेऊ या....

- **आयटीआर १ (सहज) कुणी भरायचा?** - करदाते ज्याचे पगार, पेन्शन, व्याज हेच उत्पनाचे साधन आहे, एकूण उत्पन्न ५० लाख रुपयांहून कमी आहे.
- **आवश्यक कागदपत्रे** - फॉर्म १६, बँक खाते उतारा, मुळातून कर कापल्याचे प्रमाणपत्र.
- **आयटीआर २** - कुणी भरायचा?- तुमचे उत्पन्न ५० लाखांहून कमी आहे, भांडवली नफा, घरभाडे हे तुमच्या उत्पन्नाचा भाग आहेत, परदेशात मालमत्ता आहे किंवा त्यात गुंतवणूक केली आहे.
- **आवश्यक कागदपत्रे**- फॉर्म १६, फॉर्म १६ A, भांडवली नफ्याचा तपशील
- आयटीआर ३- **कुणी भरायचा?** - पगार व्यवसाय यासह अथवा उत्पन्नाची वेगवेगळी साधने असणारे, स्वतःचा व्यवसाय असणारे, भागीदारीत व्यवसाय करणारे.
- **आवश्यक कागदपत्रे** - व्यवसायचा वार्षिक जमाखर्च, वार्षिक नफातोटा पत्रक मुळातून कापून गेलेल्या कराचे प्रमाणपत्र.
- **आयटीआर ४ (सुगम)** - एवढ्या दुर्बोधित फॉर्मच सुगम नाव ठेवणं हा मोठाच विनोद आहे.
- **हे कुणी भरायचा?** - ₹ ५० लाखांहून कमी उत्पन्न असलेले छोटे व्यावसायिक आवश्यक कागदपत्रे - बँक खातेउतारा, मुळातून करकपातीचे प्रमाणपत्र
- **आयटीआर ५- कुणी भरायचा?**- मर्यादित भागीदारी व्यवसाय, प्रोप्रायटर्स, असोसिएशन ऑफ पर्सन, अन्य फर्म ज्याचे उत्पन्न परिशिष्ट ११ नुसार करमुक्त आहे.
- **आवश्यक कागदपत्रे** - व्यवसायाचा वार्षिक जमाखर्च, वार्षिक नफातोटा पत्रक, मुळातून कापून गेलेल्या कराचे प्रमाणपत्र.
- **आयटीआर ६**- कुणी भरायचा?- कोणतीही कंपनी ज्यांचे उत्पन्न परिशिष्ट ११ नुसार करमुक्त नाही.
- **आवश्यक कागदपत्रे** - व्यवसायचा वार्षिक जमाखर्च, वार्षिक नफातोटा पत्रक, मुळातून कापून गेलेल्या कराचे प्रमाणपत्र.
- **आयटीआर ७** - कुणी भरायचा?- आयकर कायदा १३९ AA/AB/AC/AD मध्ये उल्लेख असलेल्या सर्व व्यक्ती/ संस्था यात प्रामुख्याने राजकीय पक्ष, विश्वस्त संस्था, वैज्ञानिक संशोधन संस्था यांचा समावेश होतो.
- **आवश्यक कागदपत्रे** - आवश्यक असल्यास हिशोब तपासनीसांचा अहवाल, मुळातून कर कपातीचे प्रमाणपत्र.

mgpshikshan@gmail.com

## जनसंवाद

### 'ऑपरेशन सिंदूर' माध्यम नसावे

भारतीय लष्कराने केलेल्या आपरेशन सिंदूर या धडक कारवाईमुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडले खरे पण या मोहिमेचा वापर करुन घेण्यात प्रसिद्धी लोलुप मात्र आघाडीवर राहिले. अनेक चित्रपटनिर्मात्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' या शीर्षकासाठी नोंदणी केली. एकाने तर तसे पोस्टरच रिलीज केले. वृत्तवाहिन्या तर पाकिस्तानचे नामोनिशाण मिटवण्याच्या बातम्यांचा रतीब टाकत होत्या. त्यातच भाजप आता याच मोहिमेला केंद्रित करून दहा दिवसांची तिरंगा यात्रा काढणार आहे. समाजमाध्यमांवरील ट्रोलर्सना तर ऑपरेशन सिंदूर नंतरची शस्त्रसंधी नको होती आणि ती जाहीर करणाऱ्या परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांना व त्यांच्या कुटुंबीयांना अर्वाच्य भाषेत ट्रोल करुन भंडावून सोडले. मध्य प्रदेशातील भाजपाचे वरिष्ठ नेते आणि मध्यप्रदेश सरकारचे मंत्री विजय शाह म्हणाले की, ज्यांनी भारताच्या मुलींना विधवा केले त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्याच बहिणीच्या मदतीने धडा शिकवला. '(उनकी समाज की बहन के जरीये)'. यात त्यांनी नाव घेतले नसले तरी त्यांचा रोख लष्करी अधिकारी सोफिया कुरेशी यांच्याकडे होता हे वेगळे सांगायला नको. पंतप्रधानांचाच कित्ता गिरवत भारतीयांनी भारतीय सैन्यदलाविषयी अभिमानाची भावना प्रकट केली असताना प्रसिद्धीलोलुपांचे वागणे मात्र खटकले.

**-दीपक काशिराम गुंडये**, वरळी

### बलिदानाचे राजकारण नको

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी यशस्वी 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारतीय सशस्त्र दलांच्या धाडस आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी देशाच्या विविध भागात 'तिरंगा यात्रा' आयोजित करण्यात येत आहेत. या यात्रेत सिंदूर ऑपरेशनचे नेतृत्व करणाऱ्या सैनिकांच्या धाडसाला सलाम करत नसून सत्ताधारी सशस्त्र दलाने केलेल्या धाडसाचे राजकरण करत आहेत. यापूर्वी झालेल्या ऑपरेशनवेळी अशा 'तिरंगा यात्रा' का काढण्यात आल्या नव्हत्या? सशस्त्र दलाने केलेल्या धाडसाचे असे राजकरण करुन जाहिरातबाजी कधी झाली नव्हती. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी झालेल्या जवानांचा सन्मान करावा. भारतीय सशस्त्र दलांना अटळ पाठिंबा व्यक्त करण्यासाठी तिरंगा यात्रा काढण्याची गरज नव्हती. पाकिस्तानवर संपूर्ण विजय मिळविला असता, तर देशात 'तिरंगा यात्रा' कढून उत्सव साजरा करण्याची परवानगी केंद्र सरकारने नागरिकांना द्यावी. विजय आवाक्यात असताना युद्धविराम करुन व्यापारासाठी माघार घेतली हे जवानांना व नागरिकांना पटले नाही. केंद्र सरकारने सैन दलाच्या पराक्रमाचे एकतेच्या नावाखाली जाहिरातबाजी करून बाजार मांडू नये.

**- विवेक तवटे**, कळवा

### पुणे शहरात चोरट्यांचा उच्छाद

पुणे शहरात चोरट्यांनी उच्छाद मांडला. आता दिवसाढवळ्या चोऱ्या होऊ लागल्या आहेत. गर्दीच्या ठिकाणी महिलांच्या पिशवीतील पैसे आणि दागिने, वस्तू चोरटे लंपास करू लागले आहे. एका महिलेच्या पाटल्या बसमध्येच चोरांनी कापून नेल्या. त्याचबरोबर रात्रीच्या घरफोड्या होत आहेत. मोठ मोठे चंदनाचे वृक्ष शहराच्या मध्यवर्ती भागातून कापून नेले जात आहेत. अमलदारी किंवा पॉलिसी प्रशासनाचा मागमूसही दिसत नाही. पुण्यात वाहतूककोंडी होते; परंतु या कोंडीमध्ये चोरटे सापडलेले पकडलेले दिसत नाहीत. चोरटे सराईत झाले आहेत आणि पोलीस सुस्त! त्यांच्या प्रतिकारसाठी आता सरकारने शस्त्रांचे परवाने लोकांना द्यावेत.

**- गिरीश भागवत**, यशवंतनगर

### विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपा

दहावी-बारावी परीक्षा निकाल लागल्यावर विद्यार्थी आत्महत्येच्या बातम्या वाढत आहेत. परीक्षेतील अपयश किंवा कमी मार्क पडणे, नैराश्य, विचित्र परिस्थितीमुळे असे प्रकार होत आहेत. यासंदर्भात युवापिढीच्या भावनांचा विचार करणे, तसेच शालेय व कॉलेज अभ्यासक्रमात जीवनविषयक वास्तवाचे व परिस्थितीवर मात करण्यासाठी विचार देणारा विषय असावा असे वाटते. त्यांच्याशी वारंवार संवाद साधून त्यांचे मानसिक आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे.

**- प्रफुल्लचंद्र काळे**, सातपूर

## राशिभविष्य

शुक्रवार , १६ मे २०२५

### || पंचांग ||

आज मिती वैशाख कृष्ण चतुर्थी शके १९४७. चंद्र नक्षत्र मूळ. योग सिद्ध ७.१३ पर्यंत नंतर साध्य, चंद्र राशी धनु, भारतीय सौर २६ वैशाख शके १९४७ म्हणजेच शुक्रवार दि. १६ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०३, मुंबईचा सूर्यास्त ७.०६, मुंबईचा चंद्रोदय १०.३०, मुंबईचा चंद्रास्त ८.३३, राहू काळ १०.५७ ते १२.३४, संकष्ट चतुर्थी-चंद्रोदय-१०;२७ शुभ दिवस.

### || भविष्य ||

**मेष** : लहान-मोठे आर्थिक व्यवहार करताना सावधानता बाळगावी.

**वृषभ** : आर्थिक स्थिती भक्कम राहील.

**मिथुन** : बौद्धिक क्षमता वाढेल इतरांचे प्रश्न समजून घ्याल.

**कर्क** : महत्त्वाच्या कामांमध्ये चालढकल नुकसानदायक ठरू शकते.

**सिंह** : सामाजिक मान सन्मान मिळेल.

**कन्या** : शांतपणे विचार करून निर्णय घ्या अति धाडस नको.

**तूळ** : आपल्या क्रोधावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : जुन्या ओळखी नव्याने प्रस्थापित होतील.

**धनू** : प्रवासाचे योग घटित होत आहेत.

**मकर** : विद्यार्थ्यांना नवीन नवीन कल्पना सुचतील.

**कुंभ** : विशेष प्रयत्नांची आवश्यकता राहील.

**मीन** : शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या जातकांना अनुकूल दिवस.

# ‘आकाशाचा शोध घेत मातीचे हात थांबले’



**‘आकाशाचा शोध घेत...**
**मातीचे हात थांबले...**
**वाऱ्याच्या पंखावर उसासे जडलेले...**
**संवेदनेच्या तळाशी...**
**आवाज अस्तित्वहीन निःशब्द...**
**तरीही उंच भरारी...**
**माझ्या अस्तित्वाची...’**

“आत्मा म्हणजे नक्की काय?” याच विचारांत अडकलेल्या माझ्या लेखणीतून हे काव्य उतरले. पण खरच कुणाला हा प्रश्न पडतो का? मला उमगलेला ‘आत्मा’ म्हणजे वाऱ्यावर उमटणारा निःशब्द शब्द, संवेदनांच्या सावलीत हरवलेली एक ओळख. अस्तित्वाच्या काठावर उभे असलेला एक अनाकलनीय शब्द...म्हणजे आत्मा! मातीच्या कुशीत रुजून आकाशाच्या अथांगतेचा शोध घेणारा एक श्वासांचा प्रवाह. एक संवेदना जणू, एक निःशब्द स्पंदन, कुठेतरी दूर जाणाऱ्या पावलांचा भास. ते स्पर्शाच्या आठवणीतील थरथरणे तरीही आकाशाच्या अंतराळात हरवलेले एक मौन. संवेदना म्हणजे वाऱ्याच्या लयीत विसरलेली ओळख. जेव्हा देह आणि मन एकमेकांत विरघळतात ना तेव्हा त्या तुटलेल्या शब्दांची सावली म्हणजेच जेव्हा भावना केवळ अस्तित्वाचा गूढ ध्वनी होतो, संवेदनांच्या स्पंदनात हरवलेले, वाऱ्याच्या लयीत हलणारे एक मौनाचे संगीत. जन्माच्या तळाशी लपलेली ओळख, तर मृत्यूच्या सावलीत मिटणारी एक गूढ कथा
म्हणजे ‘आत्मा’.

नितळ जगण्याच्या भावनाची मोरपंखी पैठणी म्हणजेच परशुरामी तत्त्वांना भिडताना, देहाच्या कणाकणातून उमटते ती खोलवर अज्ञात हाक, त्या हाकेतच सामावलेले चिरंतन अस्तित्वाचे गूढ. आत्म्याचा हा प्रवास म्हणजेच अवकाशातील एक गूढ प्रवाह, अनामिक स्पंदनात हरवलेली ओळख. ते अर्धवट शब्दांचा अंधार, श्वासांच्या सावलीत लपलेले अस्तित्व. जीवन जगण्याच्या या भावना म्हणजे वाऱ्याच्या लयीत विरघळलेला स्पर्श, एक शांत, तरीही धगधगता असा आक्रोश म्हणजेच मृत्यूपलीकडचा आवाज, एका अश्रूंमध्ये उमटणारा अज्ञात अर्थ.



ऋतुराज

**ऋतुजा केळकर**

कस सांगू तुम्हाला नक्की आत्म्याचा प्रवास तरी कसा असतो ते? अंधाराच्या कुशीत जन्मलेला एक निर्विकार असा प्रवास की, जो श्वासाच्या लयीत थरथरणारे एक अस्पष्ट स्पंदन. अनेकानेक इच्छांची पूर्तता करण्याकरिता आत्म्याने घेतलेला एक आधार की एक धूसर भास. तो मातीला स्पर्श करण्याकरिता होणारी त्याची तडफड आणि देहोत्सवाचे चोचले पुरवता पुरवता घेतलेली झेप आकाशाकडे, आकाशाचा शोध घेण्याकरिता, आत्म्याचा प्रवास सुरू होतो तो मृतीकेतून आणि बनतो आकाशाच्या कुशीत विरघळणारा एक विसरलेला ध्वनी. विसरलेला अश्यासाठी की तो असतो, चिरंतनतेच्या वाऱ्यावर हळुवार उडणारा एक अदृश्य भास, मृत्यूपलीकडेही जगणारा एक मौनाचा श्वास.

अस्तित्व आत्म्याचे काय वर्णू मी? तसं बघायला गेलं तर क्षणात मिटणारे, पण तरी देखील काळाच्या तळाशी खोल ठसलेले. आत्म्याचे अस्तित्व श्वासांच्या लयी पेक्षाही हलके तरीही अनंततेच्या स्पंदनात सजीव असलेले , मातीच्या कुशीत रुजून आकाशाच्या शांततेत हरवलेले. ते आहे ही नाही ही. स्पर्शाच्या पलीकडचा एक अज्ञात ध्वनी. संवेदनांच्या थरथरणाऱ्या धारात वाहत जाणारा, अंधाराच्या कुशीत विसावणारा एक निःशब्द प्रकाश. तो शब्दांत नाही, पण अनुभवाच्या प्रत्येक छटेत झळकणारा. तो मृत्यूपलीकडेही श्वास घेत राहणारा एक मौनाचा प्रवाह. आत्म्याची ओळख तत्त्वांच्या स्पर्शात विरघळते, त्याच्या अस्तित्वाचा शोध भावनांच्या सीमांपलीकडे भरकटतो.

आत्म्याच्या प्रवासाकरिता त्याला आधार घ्यावा लागतो तो शरीराचा. हे शरीर हे अध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास पंचतत्त्वांपासून बनलेले आहे. ती म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश. ही तत्त्वे केवळ शरीराच्या रचनेतच नाहीत, तर आपल्या मानसिक आणि आध्यात्मिक प्रवासातही महत्त्वाची भूमिका बजावतात. पृथ्वी हे मृत्तिका तत्त्व आहे की जे शरीरातील घन पदार्थ, हाडे, स्नायू आणि त्वचा यांचे प्रतिनिधित्व करते. शरीराला पर्यायाने आत्म्याला स्थिरता आणि सहनशक्ती प्रदान करते. आत्मा आणि पृथ्वी हा एक अदृश्य प्रवास आहे. मातीच्या कुशीत मिटणारा आणि अनंताच्या मिठीत झुलणारा. तो धुळीत रुजतो, पण वाऱ्यावर झुलतो, त्याचा स्पर्श शेवटी मातीच्या ओलसर श्वासात विसावतो. आत्म्याला पृथ्वी आकार देते, पण मर्यादेत नाही बंधू शकत. ती त्याचा देह, आणि त्याची ओळख असले तरीदेखील तो मुक्त, अस्पष्ट, गूढ आणि अचल आहे की जो संवेदनांच्या जडत्वात शरीराच्या माध्यमातून पृथ्वीशी बांधलेला आहे. म्हणूनच तो मिटतो आणि उलगडतो, पृथ्वीच्या स्पर्शात हरवूनही आकाशाच्या प्रवाहात वाहणारा एक मौनाचा क्षण बनतो. जरी आत्मा हा पृथ्वी तत्वाने बनलेला असला तरी देखील तो एक काळाच्या सीमारेषांवर विरघळणारी हलकी सावलीआहे हे नक्की. आत्म्याशी निगडीत दुसरे तत्व आहे ते म्हणजे आप म्हणजेच जल तत्त्व.

हे तत्व रक्त, रस, आणि शरीरातील द्रव पदार्थ यांचे प्रतिनिधित्व करते कारण, त्यामुळेच भावनात्मक संतुलन आणि प्रवाहीपणा टिकून राहतो. आत्मा आणि आप तत्त्व हा एक ओलसर प्रवास आहे. भावना आणि स्मरणांच्या तलावात प्रतिबिंबित होणारा. पाण्याच्या लयीत तो हलतो, विरघळतो, कधी शांत तर कधी आक्रंदतो. आत्म्याचा स्पर्श थेंबांसारखा जरी क्षणभंगूर असला तरीही चिरंतन असतो कारण तो सरीत उतरतो आणि अखेरीस अनंताच्या ओढीत हरवतो. पाणी हा त्याचा वाहता आकार असला तरीही तो त्याच्याच निर्मितीची सावली बनून नदीतून प्रवाहित होऊन अखेरीस अनंताच्या ओढीत हरवतो. संवेदनांच्या ओलसर स्पंदनात आत्मा स्वतःचाच अर्थ शोधता शोधता, जलधारांमध्ये मुक्तीचा ध्वनी उमटवीत हरवून जातो.

तिसरे तत्व अर्थातच अग्नी म्हणजेच तेज तत्त्व होय, यामुळे शरीरातील उष्णता टिकून राहते. तसेच हे तत्व पचनशक्ती आणि ऊर्जा यांचे देखील प्रतिनिधित्व करते. अग्नी तत्व हे आत्मज्ञान आणि परिवर्तन याचे देखील प्रतीक आहे. आत्मा आणि अग्नी म्हणजे एक स्फुलिंगाचा स्पर्श, क्षणात झळकणारा आणि क्षणात चिरंतनतेत विलीन होणारा. अग्नी त्याचा प्रकट आक्रोश आहे आत्मा आहे त्याच्या शांत राखेत लपलेला एक मौन की तो जळतो, उजळतो, विलीन होतो आणि पुन्हा जन्म घेतो तो अंधाराच्या तळाशी साठलेली एक श्वासांची धगधग पुनपुन्हा प्रगत करण्या करिता. जरी आग त्याला मुक्त करत असली तरीही त्याच्या अस्तित्वाचे रंग ती उलगडते, पण त्या ज्वालांमध्ये स्पर्शही न होणारी एक निःशब्द हाक असते की ज्यात आत्मा त्या अग्नीच्या लहरींवर झुलतो, तरीही त्याच्या तापातून शांततेचा शोध घेऊन तो उजळतो आणि पुनर्निर्मित होतो तो एक विरघळलेला, विसरलेला ध्वनी, अस्थिर पण चिरंतन नाजूक अग्निशिखेसारखा.

चौथे अर्थातच वायू तत्त्व, की जे श्वासोच्छ्वास, हालचाल आणि विचारशक्ती यांचे प्रतिनिधित्व करते. वायू तत्व जीवनशक्ती आणि चैतन्याचा स्रोत आहे . आत्मा आणि वायू याचा संबंध म्हणजे एक हलका श्वास, अस्तित्वाच्या सीमांना लंघणारा आणि चिरंतनतेच्या लयीत हरवणारा. तो अस्पर्श तरीही पण जाणिवेच्या कुंपणात आपल्या अस्तिवाचा खोल ठसा उमटवून ठेवणारा त्याचा स्पर्श वाऱ्याच्या झुळुकीत लपलेला असतो, तो विसरू म्हणता न विसरता येणारा, आठवण बनून स्वतःला हरवणारा पण तरीही ओळख ठेवणारा .कस आहे ना वायू आत्म्याला झुलवतो, हलवतो, पण धरून नाही ठेवू शकत. त्याच्या लहरींमध्ये आत्म्याचा मौन उमटते. आकाशाच्या कुशीत वाऱ्याच्या लयीत झुलणारा एक क्षण, ज्याचा अर्थ आत्म्याच्या प्रवासात खोलवर दडलेला आहे, म्हणूनच आत्मा वाऱ्यासारखा, अस्वस्थ, मुक्त, तरीही अढळ असून त्याच्या अस्तित्वाचा शोध शब्दांमध्ये नाही, तर अनुभूतीत आहे.

सर्वात शेवटचे आणि पाचवे महत्वाचे तत्व म्हणजे ‘आकाश तत्त्व’, की जे शरीरातील रिक्त जागा, चेतना आणि आत्म्याशी जोडते. आकाश तत्व हे जीवनातील अंतर्मुखता आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वाचे. आकाश त्याच्या प्रवासाचा साक्षीदार आहे. त्याच्या अस्तित्वाची सावली आहे.म्हणूनच आत्मा आणि आकाश एकमेकात गुंफलेले असले तरीही निराळे आहेत.

अशा या आत्म्याचा अंत आहे का? हा प्रश्न अखेरीस मनाच्या पटलावर उमटतोच.


बर तो एक प्रश्न की एक सावली? हा देखील एक प्रश्नच आहे. आत्मा हा वाऱ्याच्या ओढीत हरवलेला, तरीही अस्तित्वाच्या तळाशी खोल रुजलेला. तो मिटतो की विरघळतो? नष्ट होतो की मुक्त होतो? काहीच माहिती नाही त्याला मरण नाही हे मात्र नक्की. मृत्यूच्या कुशीत विसावतो तरीदेखील तो चिरंतनतेच्या ओलसर प्रकाशात झळकतो. म्हणूच आत्मा संवेदनांच्या धूसर सीमारेषांवर तरंगणारा एक प्रवाह आहे.

**अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचं झाल तर,**
**‘आत्मा हा सुद्धा एक भन्नाट प्रवासी,...**
**कधी मातीचा, तर कधी आकाशाचा सोबती...**
**थोडा शहाणा, तर थोडा गोंधळलेला...**
**तरीही मृत्यूपलीकडेही...**
**चालत राहणारा एकांडा वाटसरू...**

# पाहिला डोळेभरी



परमेश्वराचा विस्तार सतत होत राहिलेला आहे. आपण आपले जग आणि परमेश्वर या सर्वच एकमेकांशी अत्यंत जवळचा आणि घनिष्ट संबंध आहे, पण अशा महत्त्वाचा विषयाचा अभ्यास किंवा इतर समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्याऐवजी काही लोक विचित्र समज सर्वसामान्य लोकांत पसरवून दिशाभूल करतात. काही जण म्हणतात जगबुडी होणार. आम्ही स्पष्ट सांगतो आहोत की कुणीही कितीही सांगितले की जगबुडी होणार तरी घाबरून जाण्याचे कारण नाही. अशी जगबुडी कधीही होणार नाही आणि जगबुडी झालीच, तर कोण उरणार आहे जग बुडाले हे सांगायला. काही मूर्ख लोक असे सांगतात की, आमचे ते डोंगरावर स्थान आहे तिथे आम्ही सगळे जाऊन राहणार. अरे मूर्खांनो जग बुडाले, तर तो डोंगर बुडणार नाही का? इतकीसुद्धा अक्कल त्या लोकांना नाही. तो डोंगर कधीही पाण्याखाली जाऊ शकतो.



जीवन संगीत

**सद्गुरू वामनराव पै**

आता मुंबईचे सुद्धा कधी वाळवंट होईल सांगता येत नाही. ती कधीही पाण्याखाली जाऊ शकते. याचे कारण पर्यावरण बिघडत चाललेले आहे. काही गावे तर पाण्याखाली गेली सुद्धा आहेत. हे सर्व जर आपण पाहिले, तर परमेश्वराच्या शक्तीचा केवळ अंदाज बांधता येतो. मात्र असे असूनही परमेश्वराचे वर्णन जसा आहे तसे, जेवढे आहे तेवढे कोण करू शकेल. कुणीच करू शकत नाही. तो आहे तसा कुणीच सांगू शकत नाही. सत्य म्हणजे त्याचे असणे हे अनंत आहे. त्याचे ज्ञान तेही infinite आहे. आनंद हा ही infinite आहे. गगनाचे प्रावरण म्हणजे त्याला रूप नाही, रंग नाही असा हा डोळेभरी कसा पाहिला.


**सत्यज्ञानानंद गगनाचे**
**प्रावरण, नाही रूप गुण वर्ण**
**जेथे**
**तो हा श्रीहरी पाहिला**
**डोळेभरी, पाहता पाहणे दुरी**
**सारुनिया**

तो हा श्रीहरी पाहिला डोळेभरी. तो हा श्रीहरी म्हणजे इथेच पाहिला. बाहेरही पाहिला आणि आतही पाहिला. आत पाहिल्यामुळे तो बाहेर आहे हे दिसू लागले. बाहेरही तोच आहे हे मला दिसायला लागले. तुकाराम महाराजांचा एक सुंदर अभंग आहे.

**“अवघी भुते साम्ये**
**आली देखिली म्या कई होती**
**विश्वास तो खरा मग**
**पांडुरंग कृपेचा**
**माझी कुणी न धरो शंका**
**ऐसे हो का निर्द्वंद्व**
**तुका म्हणे जे जे दिसे ते**
**ते वाटे मी ऐसे”**

सर्व ठिकाणी मीच दिसायला लागलो. आतमध्येही तोच व बाहेरही तोच. बाहेर जो आहे तोच या ठिकाणी मी रूपाने आहे. असे हे सगळे गणित आहे. अध्यात्माचे हे जे गणित आहे ते एका अर्थी समजायला सोपे आहे व एका अर्थी ते समजायला कठीण आहे. समजायला सोपे आहे ते सद्गुरुंचे मार्गदर्शन असेल आणि समजायला कठीण असेल, तर ते सद्गुरुंचे मार्गदर्शन नसेल.

# देह हा परमार्थाचे साधन समजावा



संतांचे काम तुम्हाला देहबुद्धीपासून सोडविणे हे आहे; तुम्हाला मुलगा देणे, तुमचे दुखणे बरे करणे. म्हणजे विषय देणे, हे नव्हे. जो जो परमार्थाला लागावे तो तो देहबुद्धी तिथून ओढण्याचा जास्त जास्त प्रयत्न करते. विद्येची बुद्धी ही देहबुद्धीला धरून आहे; ती मारून आपण शुद्ध केली पाहिजे. याकरिता भगवंताच्या स्मरणासारखा दुसरा उपाय नाही. कुत्रा हा आपल्याला रात्रीच्या पहाऱ्यासाठी उपयोगी पडतो. पण तो कितीही चांगला आणि उपयोगी असला, तरी आपण त्याला पानात जेवायला घेऊन बसत नाही. त्याप्रमाणे देहाचेही आहे. आतल्या खोबऱ्याच्या रक्षणाकरिता ज्याप्रमाणे करवंटी, त्याप्रमाणे देहाला परमार्थाकरिता साधन मानावे. पण मनुष्य ‘हा देहच मी आहे ’, असे मानून व्यवहार करतो. वास्तविक, आपण देहापासून निराळे आहोत असे पदोपदी दाखवीत असतो; माझा हात, माझा पाय, माझा डोळा, माझे मन फार काय, माझा जीव असेही म्हणतो; पण वागतो मात्र ‘मी तोच आहे’ असे समजून. देहाशी संबंध जास्त येईल असेच आपण भगवंताजवळ मागतो; असे न करावे. आपल्या देहावरचे प्रेम कमी होण्यासाठी, दुसऱ्यावर प्रेम करायला लागावे. प्रेम बसायला आपल्याला आपल्यासारखाच देहधारी लागतो. कुत्रे रडत असले तरी आपल्याला नाही वाईट वाटत; पण एखादे लहान मूल रडत असले तर वाईट वाटते. देवावर प्रेम करायला, देवाला आपल्यासारखाच देहधारी कल्पावा लागतो. म्हणून, आपले देहावरचे प्रेम कमी व्हायला, देहबुद्धी कमी व्हायला, सगुणमूर्तीचे, सद्गुरूचे ध्यान करावे लागते. ते जसजसे दृढ होत जाईल, तसतसे आपण स्वतःला विसरून जातो आणि आपण देहाच्या पलीकडे गेलो, म्हणजे सद्गुरूचे खरे स्वरूप हे देहातीत आहे असे प्रत्ययाला येते. देहबुद्धी नष्ट होईल तसतशी सद्गुरूची खरी ओळख होईल. ज्याने देहाभिमान नष्ट केला त्याचा मोठा ज्ञानीसुद्धा हेवा करतो. ‘मी देह’ म्हणावे, यापलीकडे दुसरे अज्ञान कोणतेही नाही. मी भगवंताचा असून देहाचा म्हणणे यासारखे दुसरे खोटे नाही. प्रपंचात संकटे येतात, तरी पण तो सोडावासा वाटत नाही; याहून भगवंताची माया ती कोणती? अतिसहवासामुळे देहाचे ममत्व सुटत नाही. परमात्म्याचा सहवास, उदाहरणार्थ, देवाला जाण्याचा वा जप करण्याचा नेम केला, म्हणजे देहाचे ममत्व थोडे थोडे कमी होते. देहाच्या सहवासाने आपण देहाचे होतो, नामाच्या सहवासाने आपण परमात्म्याचे होऊ.



अध्यात्म

ब्रह्मचैतन्य

**श्री गोंदवलेकर महाराज**

**तात्पर्य : भगवंताच्या स्मरणामध्ये देहबुद्धीचे मरण आहे.**

# सुसंगती सदा घडो

सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो
कलंक मतीचा झडो विषय सर्वथा नावडो
सदन्घ्री कमळी दडो मुरडीता हटाने अडो
वियोग घडता रडो मन भव्त्चरीत्री जडो

न निश्चय कधी ढळो कुजनविघ्नबाधा टळो
न चित्त भजनी चळो मतीस दुप्त मार्गे वळो
स्वतत्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो
पुन्हा न मन हे मळो दुरित आत्मबोधे जळो

नजे प्रियस दोष ते प्रियस दोषही चांगले
स्वतोक पितरा रुचे जरी हि कर दमी रांगले
तुलाची धरी पोटीशी कशी तदा यशोदा बरे
जरी मळवीशी रजो मलीन काय तू अंबरे

पिता जरी विटे विटोन जननी कुपित्री विटे
दया मृतर सार्धधी नकुल कःजले त्या किटे
प्रसादपट झाकिती परीपरा गुरुचे थीटे
म्हणोनी म्हणती भले न ऋण जन्मदेचे फीटे

कृतात्त कटका मल ध्वज जरा दिसो लागली
पुरःसर्गता स्वये झगडता तनु भागली
सहाय दुसरा नसे तुज विणे बळे आगळा
लहू जरी उताविळा स्वरी तो कापितो आगळा

दया मृतघना अहो हरीवळा मयुराकडे
रडे शिशुतया सी घे कळवळोनी माता कडे
असा अतिथी धार्मिकस्तुतपदा कदा सापडे
पुन्हा जड भवारणवी उतरिता नदा सापडे

आई व तिचे मूल यांचे प्रेमसंबंध कोणत्या प्रकारचे असतात यावर प्रकाश टाकणारे केकावलीतले श्लोक, याच संदर्भात केकावलीच्या शेवटी ११८ व ११९ या केकांतून मोरोपंतानी परमेश्वराकडे केलेले अखेरचे मागणे मला पसायदानाइतके महत्त्वाचे वाटते. हे मागणे घरोघरी होणाऱ्या रोजच्या प्रार्थनेत जमा व्हावे अशा तोडीचे आहे. ‘सुसंगती सदा जडो, सुजन वाक्य कानीं पडो’ या चरणाने सुरू होणारी ११८वी केका व ‘न निश्चय कधी ढळो, कुजनविघ्नबाधा टळो’ या चरणाने सुरू होणारी ११९वी केका महाराष्ट्रात अनेकांच्या तोंडी आहे.

जेव्हा मानवी जगण्यातला व त्याच्या प्रयोजनातला सुसंवाद तुटतो तेव्हा हे जगणे अर्थहीन होते. जगण्यासाठी संघर्ष अत्यावश्यक आहे. मात्र संघर्षातली मानवी मने जोडण्यासाठी सुसंवादही तितकाच गरजेचा आहे. मोरोपंत जो सुसंवाद आपल्या युक्तिवादातून परमेश्वराशी घडवून आणतात, तो मानवी मनाचे प्रयोजन दाखविणारे चित्र डोळ्यापुढे उभे करतो. आज आपला हा संवाद सतत तुटत चाललेला आहे. एकदा संवादाचे महत्त्व पटले की आपल्या जगण्याची शैली अचूक वळणाने जाते. मोरोपंतांनी ती आर्ततेने दाखवून दिली.

सुसंगती आणि सुजन वाक्य हे तर रोजच्या जगण्याचे प्रयोजन आहे. आम्हाला संगती आणि विसंगती यांचे अतूट नाते वेगळे करता येत नाही आणि यासाठी सुजन वाक्याची गरज आहे. वाक्य हे कर्ता, कर्म आणि क्रियापद यांनी पूर्ण होते. यातले एकही पद कमी झाले तर वाक्याला अर्थ राहत नाही. पूर्ण वाक्य आपल्या पूर्ण जगण्याचे मर्म आहे. असे वाक्य दुर्जनही स्वीकारू शकतो मात्र त्याच्याजवळ सुसंगती नसते. सुसंगती आणि पूर्ण वाक्य यांची जोड हेच सज्जनाचे लक्षण आहे. आज आपण या वळणाला पारखे झाल्याने आपल्या जगण्यात संघर्ष येतो; सुसंवाद येत नाही. सुजन वाक्याच्या उच्चाराने जेव्हा आपले कान तृप्त होतात तेव्हा त्या वाक्याचा पूर्ण अर्थ आपल्या हृदयात स्थिर होतो. मग या उच्चाराला आचाराची जोड मिळते. जगण्याला दिशा सापडते. यंत्रवत जगण्याचा हेतू शून्य रटाळपणा अचूक मार्गदर्शनातून बाजूला काढता येतो. मोरोपंतांनी आपल्या पद्यातून हे मागणे परमेश्वराकडे केले. आपले प्रयोजन वेगळे असेल मात्र मार्ग एकच आहे. इथे तपशिल वदलला तरी तत्व तेच आहे.

मला सरळ मार्गाने जायचे आहे. वळणावर थांबून पुन्हा तोच सरळ मार्ग तोडायचा आहे. मी आखलेली सरळ रेषा इतरांनाही नागमोडी करता येणार नाही; कारण तिचा प्रारंभबिंदू सुजन वाक्यातून ठळक झालेला आहे. मोरोपंताची कविता आणि त्यातली आत्मपरता ही आजच्या आत्मपरतेपेक्षा वेगळ्या प्रकृतीची असली तरी ती आपल्या आजच्या जगण्याला सतत जाणवावी, असेच तिचे स्वरूप आहे. त्यातली मनाची आर्तता सतत प्रकट होते. आपल्या उतार वयात आणि उतरती कळा लागताना ही उपदेशप्रधान कवितासुता वयाने व गुणाने प्रौढ होऊन आपल्याला नवा आधार देते. हा उपदेश योग्यस्थळी पडणे व तेथेच स्थिर होणे तुमच्या कालोचित जगण्याशी निगडित आहे. इथे कवीची औचित्यपूर्ण प्रार्थना हीच तुमच्या रोजच्या जगण्याची अंतर्मुखता असते. मी जगण्याचा मार्ग शोधला आहे. त्यातली बाळबोध सरळ रेषा स्थिर आहे. त्यावरच माझे जाणे-येणे क्रमबद्ध झाले आहे. वाद, संवाद आणि सुसंवाद तसेच गती, विसंगती आणि सुसंगती या रेषेला छेद देणारी नसून आपल्या सुजन वाक्याची पूर्तता करणारी आहेत.

# आजोळच्या संस्कृतीची शिदोरी

नुकत्याच मे महिन्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. मे महिना म्हटलं की डोळ्यांसमोर येतं ते आजोळ म्हणजेच मामाचं गावं.

प्रत्येक मुलांच्या जिव्हाळ्याचा विषय. पूर्वी एखाद्या मौंजीबंधन, लग्नप्रसंग व मे महिना असे वर्षातून एकदाच आजोळी जायला मिळत असे. “झुक झुक आगीनगाडी धुरांच्या रेषा हवेत काढी”... असे गाणे म्हणत त्या दिवसाची वाट बघण्यात पूर्ण वर्ष निघून जायचं. आजही आजोळ आठवलं की डोळ्यांसमोर येते ती आजोळची अल्हाददायी पहाट. पहाटे पहाटे जाग यायची तीच मुळी आजी म्हणायची त्या ओव्यांनी. एकत्र कुटुंबपद्धती असल्याने घरामध्ये पंचवीस-तीस जणांचा राबता असायचा. आजी नेहमी चार वाजता उठायची. उठल्यावर अंगणात सडा सारवण करून त्यावर सुंदर रांगोळी काढली जायची. अंघोळ वैगेरे आटोपून अंगणातील तुळशी वृंदावनातील तुळशीची पूजा करून ती जात्यावर बसत असे, तिच्यासोबत मामी पण बसत असे आणि दोघी मिळून ओव्या म्हणत असत. पहाटे आजीच्या ओव्यांनी जाग येणं म्हणजे पूर्ण दिवस मन प्रसन्न राहणं.

**पहिली माझी ओवी गं,**
**हात खुंट्याला लाविला**
**देव तो विठ्ठल पहिला**
**ओवीला गाईला !!**
**दुसरी माझी ओवी गं**
**जात्याच्या पाळीला**
**ओवीला गं लेक बाई**
**माझ्या वनमाळीला!!**

या ओव्या ऐकता ऐकता आम्हाला जाग यायची. त्या ओव्यांमधून देवांची चरित्रे, ऐतिहासिक गोष्टी यांचे देखील वर्णन व्हायचे. अंघोळी वगैरे आटोपून देवघरात सर्व आरतीला जमायचे. तोवर आजोबांची पूजा झालेली असायची. आरती झाल्यावर सर्वजण एकत्र बसून न्याहारी करायचो. नंतर मामा आम्हाला गाव फिरवायला नेत असे. गड किल्ले करायला, विहीरीत पोहायला शिकवत असे. आता मात्र गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी असे म्हणण्याची वेळ आली आहे. आता विभक्त कुटुंब पद्धती आल्याने आजोळ पण विभक्त झाले आहे. मातीचे अंगण जाऊन तिथे कॉंक्रीटचे अंगण झाले. पहाट आता सकाळी सहा वाजता होते. जात्याचा उपयोग फक्त लग्नप्रसंगी होतो. आता पहाटेच्या ओव्यांऐवजी भांड्यांच्या आवाजाने जाग येते. सुट्ट्यांमधले मामाचे गाव हरवत चालले आहे.



त्यातील मायेचा ओलावा संपत चालला आहे. आता आम्ही सुट्ट्या लागण्याआधी टूर्स पॅकेज बुक करतो. यावर्षी आम्ही बाहेर फिरायला जाणार आहोत. आम्ही पुढच्या वर्षी येतो असे कारणं सांगतो. वाट पाहत असलेल्या वृद्ध डोळ्यांतले पाणी जर आम्हाला दिसत नाही तर त्या कंपित आवाजातल्या ओव्या आमच्या मुलांना कशा साद घालणार? कशी आमच्या मुलांना नाती काय असतात, गावाकडची संस्कृती काय असते, एकत्र कुटुंबपद्धती काय असते हे कळणार. फक्त पुस्तकात वाचून हे ज्ञान उपयोगाचे नाही, तर त्याला मायेचा स्पर्श सुद्धा असायला हवा. तरच ते हृदयाच्या कुपीत जतन करता येईल आणि त्याचा सुगंध पिढी दर पिढी वाढत राहील. काळानुसार जीवनशैली बदलली आहे हे अगदीच मान्य आहे पण जेव्हा सुट्ट्या असतात तेव्हा सर्वांनी नियोजन करून एकत्र जमून नात्यांमधील मायेचा ओलावा टिकवून ठेवणे गरजेचे आहे. नाहीतर पुढील पिढीला फक्त आई, बाबा आणि मुलगा/मुलगी हीच नाती फक्त माहीत होतील. तसेच नुसते एकत्र जमून मोबाइलमध्ये रमणे हा देखील त्याच्यावरचा उपाय नाही. तर सर्वांनी जेवण, चहा, न्याहारी एकत्र करत असताना प्रत्येकाने आपापल्या लहानपणाचे गोड अनुभव सांगितले पाहिजेत. तसेच मोठ्यांचा आदर व लहानांवर प्रेम कसे केले जाते हे आपल्या वागण्यातून दाखवून दिले पाहिजे. मोठ्यांना उलट बोलणे, कसे चुकीचे आहे हे समजावून सांगितले पाहिजे. हीच तर आपली भारतीय संस्कृती आहे. आपल्या संस्कृतीचे पाश्चिमात्य देशांनी अनुकरण करायला घेतले आहे मग आपली ही संस्कृती आपल्या लहानांपर्यंत पोहोचवणे आपली जबाबदारी नाही का? प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की लहान मुले मोठ्यांचे अनुकरण करतात तेव्हा आज तुम्ही जसं त्यांच्या समोर वागाल ते सुद्धा तुमच्यासोबत तसेच वागतील. कित्येक घरांमध्ये सकाळी उठल्यावर मोठ्याने इंग्रजी गाणी लावली जातात आणि ही मंडळी अभिमानाने सांगतात की आमची मुले इंग्रजी गाणी, इंग्रजी सिरीयलच पाहतात. कसला वृथा अभिमान म्हणावा हा... आणि जेव्हा हीच मुले नोकरीनिमित्त परदेशी जाऊन स्थायिक होतात तेव्हा कुठे जातो हा अभिमान? आज पाश्चिमात्य देशांची सकाळ “ओंकार” उच्चाराने होते. आपल्याकडे जरी पहाटेच्या ओव्या ऐकू येत नसल्या तरी प्रत्येक घराघरांत किमान “कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती। करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम्।” हा श्लोक म्हटला गेला पाहिजे. लहान मुलं मातीसारखी असतात त्यांना तुम्ही जसं घडवाल तशी ती घडतील. लहान मुलांची आकलन शक्ती जास्त असते तुम्ही सतत त्यांना श्लोक, स्तोत्र ऐकवत राहिलात किंवा तुम्ही स्वतः म्हणत राहिलात तर ती मुले लवकर आत्मसात करतात. अलीकडे तर संध्याकाळच्या वेळी पाढे, गोष्टी सांगणे हे एखाद दुसरा अपवाद वगळता पूर्णतः बंद झाल्या आहेत.

सात वाजता सिरीयल चालू होतात म्हणून आम्ही देवापुढे दिवा सुद्धा साडे सहालाच लावतो. मग मला सांगा मुलांनी, नातवंडांनी पुढे तीच परंपरा चालू ठेवली, तर यात दोष त्यांना का म्हणून द्यायचा. ते तेच करतात जे त्यांनी लहानपणापासूनच बघितलं आहे. आजोळच्या संस्कृतीच्या शिदोरीची चव ज्यांनी ज्यांनी चाखली त्यांनी पुढच्या पिढीला सुद्धा त्यातील गोडी चाखायला द्यावी... निदान प्रयत्न तरी करायला हवाच!



मनाचा गाभारा

**अर्चना सरोदे**

# बार्टीची शिष्यवृत्ती योजना बंद!

**माहिती** | **९०% वर गुण त्याला २ लाख रुपये !**

आप्पासाहेब मकासरे नगर

नगर:सोशल मीडियावर सध्या डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या नावाने एका जाहिरातीत ९०% वर गुण मिळवणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना दोन लाख रुपये देण्यात येणार असल्याचा मेसेज जोरदारपणे फिरत असून ती फक्त अफवाच व खोटा प्रचार व प्रसार केला जात असल्याचे बार्टीकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या वतीने २०११मध्ये दहावीत ९० टक्यावर गुण घेणाऱ्यांसाठी सुरू केलेल्या व सध्या बंद असलेल्या योजनेचा खोटा प्रचार केला जात आहे ही योजना बंद झालेली असुन असून ९०% वर गुण घेणाऱ्यांना कुठलाही आर्थिक लाभ दिला जाणार नाही असे बार्टी कडून स्पष्ट करण्यात आले आहे. बार्टीने २०21 मध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना सुरू करण्यात आली होती यामध्ये ९० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना दोन लाख रुपये देण्यात येणार होते त्यासाठी बार्टीने अर्जही स्वीकारले होते परंतु पुढे त्या योजनेचा बोजवारा उडाला चार वर्षांनी त्या योजनेची जहिरात वापरून खोटा प्रचार सुरू आहे व ती जाहिरात फिरवली जात आहे. त्या संदर्भात डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या कडे चौकशी केली असता अशा अफवावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

> २०२१ साली ही योजना जाहीर करण्यात आली परंतु अंमलबजावणी झाली नाही सध्य स्थितीत ही योजना सुरू नाही बार्टी तर्फे अशा स्वरूपाची कोणतेही अनुदान योजना राबविण्यात येत नाही
> –सुनील वारे,महासंचालक बार्टी

## भारतीय सेनेच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा

नियोजन:मुख्यमंत्री,उप मुख्यमंत्र्यांसमवेत पंकजा मुंडेंचा सहभाग



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई ;भारतीय सेनेने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दाखविलेल्या शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली. या यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी देशसेवा केलेल्या सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी आणि जवानांची लक्षणीय उपस्थिती होती.

ऑगस्ट क्रांती मैदान ते गिरगाव चौपाटीपर्यंत काढलेल्या या तिरंगा यात्रेला मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ऑगस्ट क्रांती मैदानातील स्तंभाला अभिवादन करुन तिरंगा यात्रेला सुरुवात झाली आणि गिरगाव चौपाटी येथील हुतात्मा तुकाराम ओंबाळे यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण करत अभिवादन करुन या यात्रेचा समारोप झाला. या तिरंगा पान २ वर

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

अभिनंदनिय:कन्हेरवाडी विद्या विकास हायस्कूलचे यश



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील कन्हेरवाडी येथील विद्या विकास हायस्कूल शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुमार्च २०२५ या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा १४ मे रोजी विद्या विकास हायस्कूल येथे जंगी सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष ड लालासाहेब कवडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच ड रामराजे जाधव हे उपस्थित होते या वेळी ग्रामस्थ व पालक नेताजी कवडे,आबासाहेब जाधव,अनंत पाटील,रणजित कवडे, विजय कवडे,विक्रम विजयराव कवडे,चंद्रसेन जगताप शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री.बापूराव कवडे,पत्रकार महेश मिटकरी,पत्रकार रामराजे वमन (जगताप),शेषेराव सावंत तसेच शालेय समितीचे सदस्य अशोक कवडे,प्रा संजय मिटकरी उपस्थित होते कार्यक्रमाचे उध्दघाटन मान्यवरांच्या हस्ते कै.शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी,महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व श्रीफळ वाढवून करण्यात आले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे व ग्रामस्थ आणि पालक यांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले तर प्रास्तविक करताना विद्यालयाचे सहशिक्षक माळी एस.एल यांनी शाळेचा निकाल ९६.५५ % लागल्याचे यावेळी सांगितले विशेष प्रावीण्यासह १६ विद्यार्थी प्रथम श्रेणी ६ द्वितीय श्रेणी ५ तृतीय श्रेणी १असे गुण मिळवल्याचे सांगितले प्रथम क्रमांकाची विद्यार्थिनी जाधव सई लक्ष्मण हिने ९४.२० % गुण मिळवले कार्यक्रमाचे अध्यक्ष ड.लालासाहेब कवडे यांनी तिच्या पालकांसह सत्कार केला द्वितीय क्रमांक जाधव अनिकेत आबासाहेब याने ९३.००% गुण मिळवल्या बद्दल कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सरपंच ड रामराजे पान २ वर

## ...अन्यथा करणार आमरण उपोषण!

ज्ञानदेव लोंढे:खडकत प्रकरणात दिला इशारा



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:तालुक्यातील खडकवाडी ग्रामपंचायतीतील अपहार, भ्रष्टाचार आणि योजनांतील अनियमिततेच्या विरोधात ग्रामस्थ ज्ञानदेव लोंढे यांनी २९ मे २०२५ पासून पंचायत समिती कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

लोंढे यांनी सांगितले की, ग्रामसभेचे नियमानुसार आयोजन न केल्याने सरपंचाच्या अपात्रतेसाठी ७ मार्च २०२४ रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती, परंतु अद्याप त्यावर कोणताही निर्णय झालेला नाही. तसेच, दलित वस्ती विकासासाठी मंजूर ₹४.३६ लाखांचा अपहार, प्रधानमंत्री आवास योजनेत लाभार्थी निवडीस विलंब, शौचालय अनुदान वितरणातील अडथळे, आणि मनरेगामधील बोगस बिलांबाबतही त्यांनी प्रशासनाकडे लेखी तक्रार केली आहे.पंधरा दिवसांत योग्य ती कारवाई न झाल्यास, मी अमरण उपोषणाला बसणार आहे आणि यासाठी प्रशासन जबाबदार असेल, असा ठाम इशारा लोंढे यांनी दिला आहे.



परळी: येथील औष्णीक विद्युत केंद्रात बुद्ध पौर्णिमा साजरी झाली. यावेळी प्रभारी उपमुख अभियंता हिंमतराव अवचार, अधिक्षक अभियंता राजीव रेड्डी, कल्याणाधिकारी शरद राठोड, कार्यकारी अभियंता एस.व्ही.माने, डॉ बाबासाहेब आंबेडकर व जोतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीचे महेंद्र रोडे, उपकार्यकारी अभियंता श्रीकांत इंगळे, संघक्षित मस्के ,व्याख्याते आनंद तुपसमुद्रे आदी.

## कासारीत बैलगाडा शर्यतीचा थरार

नियोजन:भागवत दराडे वाढदिवस उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिंद्रुड:धारूर तालुक्यातील कासारी येथे युवानेते भागवत दराडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय बैलगाडा शर्यत बुधवारी पार पडली.हजारो शौकिनांच्या उपस्थितीत जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील शेतकरी चंद्रकांत खोमने व प्रताप नाझरकर यांच्या पक्षा–पिस्टन बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवत उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. ५१ हजार रुपये रोख बक्षीस देत बैलगाडा मालकाचा सन्मान करण्यात आला.

कासारी येथे मागील तिन वर्षांपासून जैतापूर सरपंच भागवत दराडे यांच्या वाढदिवस निमित्ताने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात येते. बुधवारी आयोजित बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन माजी सरपंच शामसुंदर बडे, सदाशिव बडे, मनोहर बडे, जमरी सय्यद, प्रशांत बडे, अंकुश बडे यांच्या हस्ते करण्यात आले. १४५ बैलगाडा मालकांनी राज्यभरातून कासारी येथे दाखल होत शर्यतीत सहभाग नोंदवला. आठ राऊंड मध्ये प्रथम व द्वितीय येणाऱ्या बैलगाड्यांची उपांत्य फेरी घेण्यात आली. चार उपांत्य फेरीत विजय मिळवणाऱ्या आठ बैलजोड्यांचा अंतिम सामना खेळविण्यात आला. डोक्यावर प्रचंड उन तळपत असताना सुद्धा हजारो प्रेक्षकांनी मैदानाच्या दुतर्फा गर्दी केली होती. कोणत्याही बैलगाडा मालकावर अन्याय होऊ नये म्हणून संयोजकांनी अचूक निर्णय व्हावा यासाठी खास लाईव्ह व्हिडिओ ग्राफीची पान २ वर

## कार्यकर्तृत्वाची घेतली दखल!

अभिनंदनिय:विक्रम शिंदे पुरस्काराने सन्मानित



पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:मराठी साहित्य क्षेत्रात मानवतावादी कवितांच्या माध्यमातून प्रबोधनाच्या कार्याबद्दल तसेच सातत्याने मराठी साहित्य चळवळ वाढावी म्हणून पुस्तक लेखन, वाचन, निर्मिती, पुस्तक प्रकाशन यामध्ये नवनवीन प्रयोगांसह रचनात्मक पातळीवर केलेल्या योगदानाबद्दल कवी विक्रम शिंदे यांचा २०२५ वर्षीचा अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा 'संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय युवा साहित्यरत्न पुरस्कार' हा पुरस्कार देवून गौरव करण्यात आला.

सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, राज्याचे माजी पाणीपुरवठा मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, लोकशाही टीव्हीचे संपादक विशाल पाटील, अ.भा. पान २ वर

## पालखी महामार्गाला गेले तडे

सिद्धार्थ खरात:पालखी मार्गाच्या निष्कृष्ट कामाची पाणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:२ जून पर्यंत रस्त्याचे काम न झाल्यास उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीर्व आंदोलन आमदार सिद्धार्थ खरात.. शेगाव पंढरपूर पालखी मार्ग हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट होता परंतु मेकर ते लोणार हे काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचा काम झालेला आहे या पालखी मार्गाला जागोजागी मोठ मोठे तडे झाले यामधून दुचाकी चे पूर्ण चाक जाऊन बसते यामुळे अनेक अपघात झाले अनेकांना आपला जीव गमावला लागला तर अनेकांना कायमचे अपंगत्व आहे निष्कृष्ट कामाची तत्काळ चौकशी करा हा रस्त्याचे काम सुरू असताना या निष्कृष्ट काम करणाऱ्या वर करणाऱ्यांवर पाठीशी घालण्यावर अधिकारी यांच्यावर कायदेशीर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी आमदार सिद्धांत खरात यांनी राज्य रस्ते विभागाच्या सचिव व अधीक्षक अभियंता यांच्याकडे केली आहे २ जून रोजी शेगाव पंढरपूर पालखी मार्गावर अनेक वारकरी बांधव सह आंदोलन करण्यात येईल पान २ वर

**बोंबला** | **नियमबाह्य मावेजा केला वितरित**

# भूसंपादनाच्या एकाच प्रकरणात दुहेरी लाभ



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:तालुक्यातील तिप्पटवाडी येथील गाव तलाव क्र–१ मध्ये संबंधितांना भूसंपादन कायदा १८९४ नुसार दिनांक ३० जानेवारी २०१४ रोजी निधी वाटप केला होता. त्यानंतर भूसंपादन कायदा २०१३ लागू झाला त्यामध्ये कलम २३ व ३० नुसार भूसंपादन कायदा १८९४ नुसार वाटप केलेली रक्कम वजा करत २०१३ च्या नवीन कायद्यानुसार निवडा केला अन् निधी मागणीसाठी उपजिल्हाधिकारी(रोहयो) यांचेमार्फत शासनाकडे पाठविण्यात आला. शासनाने या अगोदर भूसंपादन कायदा १८९४ नुसार निधी वितरित केला असल्याने २०१३ नवीन कायद्यामध्ये सदर प्रकरण बसत नाही त्यामुळे निधी मागणी प्रस्ताव नाकारन्यात आला.

शासनाने निधी मागणी प्रस्ताव फेटाळल्यानंतर प्रकरणी कार्यकारी अभियंता, ल.पा.जि.प. बीड यांच्याकडे निधी मागणी सादर करून शासनाची फसवणूक श्री. निलेश बागडे क.ली. यांनी केली अन् निधी मंजूर करून आणला त्यानंतर उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर, अव्वल कारकून श्रीनिवास मुळे, कनिष्ठ लिपिक निलेश बागडे यांनी संगनमताने रक्कम रु.४९२५०५८/–चा निधी नियमबाह्य वितरित केला करिता मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करून तीन महिन्यात सखोल चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश सह–आयुक्त (पुनर्वसन) छत्रपती संभाजीनगर यांनी दिले आहेत.

### आयुक्ताच्या पत्राला केराची टोपली

विभागीय आयुक्तांनी ३ महिन्यात चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्यानंतरही धुमाळ उपजिल्हाधिकारी (समन्वय) बीड हे संचिका लपवून ठेवत आहेत संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यावर कारवाई होऊ नये यासाठी प्रयत्न करत आहेत. गेल्या दोन महिन्यापासून प्रकरणाचा पाठपुरावा करत आहे अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी यांच्या समक्ष तक्रारीच्या अनुषंगाने कसल्याही प्रकारची मांडणी न केल्याने प्रकरण निकाली निघण्यास विलंब होत आहे. सदर प्रकरणी त्वरित कारवाई न झाल्यास वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करणार आहे.

–अजय सरवदे
जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

## ...अन्यथा अमरण उपोषण

रोहन गलांडे:चिंचोली माळी अतिक्रमण प्रश्न



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील व ग्रामीण महामार्ग हद्दीत येणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्यासाठी २६ एप्रिल रोजी आत्मदहन दिला होता परंतु आपन दिलेल्या पत्राद्वारे ३० दीवसाचा वेळ मागितला आहे तरी आपन ३० दीवसात अतिक्रमण हटविण्यात आले नाही तर २७ में २०२५ रोजी अमरण उपोषन करणार आहे तरी उपोषणा दरम्यान मला काही झाले तर हानिक बांधकाम विभाग पंचायत समिती केज व प्रशासन जबाबदार राहील.या विषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील बांधकाम विभाग केज यांच्या हद्दीत येणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्यासाठी २६ एप्रिल रोजी आत्मदहन करण्याचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांना देतो आहे तरी आंदोलन दरम्यान मला काही झाले तर प्रशासन जबाबदार राहील असे निवेदनाद्वारे आपनास कळविण्यात येते आहे तरी ३० दीवसात अतिक्रमण हटविण्यात यावे ही नम्र कळकळीची विनंती प्रशासनाला निवेदन देण्यात दीला आहे.